**प्रकरण-2**

# वाङ्मयाची कालिक संकल्पना आणि ग्रामीण मराठी कादंबरीच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता

## 2.1प्रस्ताविक:

प्रबंधाचा विषय 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी: एक चिकित्सक अभ्यास' (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) असा आहे. अभ्यासासाठी जेव्हा ठरावीक असा कालखंड निवडला जातो तेव्हा तो विशिष्ट कालखंड निवडण्यामागे काही एक होतू निश्चितच असतो. तो हेतू सुरुवातीलाच स्पष्ट करणे आवश्यक असते. तसेच, या अभ्यासातून काय साध्य करायचे आहे? म्हणजे या अभ्यासाचे उद्दिष्ट काय? हे देखील स्पष्ट करणे महत्त्वाचे असते. निवडलेला कालखंड हा एक विविक्षित कालखंड असल्यामुळे, सुरुवातीलाच 'वाङ्मयीन कालखंड' ही संकल्पनाही स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. या प्रकरणात कालखंड ही संकल्पना स्पष्ट करून वाङ्मयाच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता स्पष्ट केली आहे. जेणेंकरून या अभ्यासात कालिक अभ्यासाचे असलेले महत्त्व स्पष्ट होणार आहे. तसेच अभ्यासासाठी जो 'ग्रामीण कादंबरी' हा 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचा एक उपप्रकार निवडला आहे त्याचा कालिक परामर्श घेऊन त्याचा उगम, त्यात आलेली स्थित्यंतरे, या प्रकाराने एकूण वाङ्मयावर आपली उमटवलेली नाममुद्रा आणि या प्रकाराची आजची स्थिती या संदर्भात जाणून घेतानाच, भविष्यकालात 'ग्रामीण कादंबरी' ची वाटचाल कशी असेल याबद्दल काही एक विधान करणे देखील शक्य होणार आहे.

## 2.2 कालखंडाची संकल्पना

काल आणि कालखंड या संज्ञा अनेक अभ्यास क्षेत्रात वापरल्या जातात. ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित आणि इतिहास अशा अनेक ज्ञानक्षेत्रात ही संज्ञा वापरली जाते. या सर्वच क्षेत्रात ही संज्ञा एकाच अर्थाने वापरली जाते असे मात्र नाही. ज्योतिष शास्त्रामध्ये ग्रह नक्षत्रांच्या स्थिती गतीनुसार ही संज्ञा वापरली जाते. गणितामध्ये ही संज्ञा मर्यादित अर्थाने वापरली जाते. काळाचे प्रवाहीपण दाखविणे एवढाच येथे या संज्ञेचा उद्देश असतो. तत्त्वज्ञानामध्ये ती शाश्वततेच्या संदर्भातही वापरली जाते. इतिहास आणि वाङ्मयाच्या अभ्यासात मात्र एकाच अर्थाने वापरले जात असल्याचे दिसते. इतिहासात एकूणच मानव समुहांच्या विकासाचे मूल्यमापन करण्यासाठी एक गणन पद्धती म्हणून ती वापरली जाते. वाङ्मयातही ती गणन पद्धती म्हणूनच वापरली जाते.

काळ ही अनादी काळापासून चालत आलेली, सतत चालणारी व सदैव प्रभावी असणारी अशी नैसर्गिक प्रक्रिया आहे. पृथ्वीचे सूर्याभोवतीचे भ्रमण व स्वतःभोवती चे परिवलन यामुळे पृथ्वीवर दिवस व रात्र या घटना, परिसरातील बदल, विविध ऋतू या नैसर्गिक घटना आपणाला अनुभवता येतात. या सर्व घटनांना केंद्रस्थानी ठेवून 'कालगणना शास्त्र' अस्तित्वात आले आहे. आपली कालगणना ही पृथ्वीवर शक्य आहे. पृथ्वीचा अक्ष सोडला की कालगणना ही संज्ञा निरर्थक ठरते.काळ ही संकल्पना पृथ्वीच्या परिभ्रमणाच्या आणि परिवलनांशी निगडित असल्यामुळे काळ ही संकल्पना स्थळ या संकल्पनेशी अपरिहार्यपणे जोडली गेली आहे. अनेक नैसर्गिक घटना, मानवी कृती यामधील अंतर व त्या घटना कृतींचा एकमेकाशी असलेला वा पूर्वापार चालत आलेला संबंध व त्याचा पुढे होणारा परिणाम, या सर्व घटनांबद्दल मानवी मनात जिज्ञासा असते. या जिज्ञासेतूनच माणसाला कालमापनाची गरज भासू लागली व त्यातूनच त्यांने आपल्या सोयीसाठी कालमापनाची परिमाणे निर्माण केली. काळ ही जरी 'ना आदी ना अंत' अशी असलेली गोष्ट असली तरी, काही परिमाणे निश्चित करून आपणाला त्यांची गणना करता येते व त्यामुळेच या गणनेत काळाचे काही खंड निर्माण करणे शक्य झाले आहे. मानवनिर्मित व निसर्गनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतच्या काळाला आपण एक कालखंड असे म्हणू शकतो. इतिहासाच्या अभ्यासात कालखंड ही संज्ञा महत्त्वाची असते कारण इतिहासाची मांडणी कालखंडाच्या आधारे करणे सोपे जाते व त्यामुळे इतिहासाच्या मांडणीत नेमकेपणा येतो. अर्थात, ऐतिहासिक कालखंड नैसर्गिक घटनांनी बद्ध असण्यापेक्षा कल्पनेने मानलेले, तार्किक किंवा काही विशिष्ट हेतू ठेवून मुख्यतः केलेले असतात. त्यातही आपण जे कालखंड मानतो ते हेतुपुरस्सर असेच असतात व म्हणूनच वाङ्मयात कालखंड नेमके कसे मानावेत याबद्दल वाद असतात. अगदी वाङ्मयीन निकषांवर कालखंड मानायचे असे म्हटले तरीही वाद निर्माण होतात. म्हणूनच असे म्हणावे लागते की, 'वाङ्मयातील कालखंड हे नैसर्गिक नसतात ते मानलेले असतात व ते तसे मानावेच लागतात. वाङ्मयीन इतिहासाची व्याख्या करताना डॉ. दत्तात्रेय पुंडे यांनी 'वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास' या लेखात जी व्याख्या केली आहे ती अशी, "एका विशिष्ट भाषेतील आरंभापासून विद्यमान काळापर्यंतच्या समग्र वाङ्मयीन कृतीचा आणि वाङ्मयीन घडामोडींचा एक विशिष्ट वाङ्मयीन संबंध, दृष्टिकोन घेऊन केलेला परंपराधिष्ठित ऐतिहासिक अभ्यास म्हणजेच वाङ्मयीन इतिहास."[1] वाङ्मयीन इतिहासाची संकल्पना स्पष्ट करणारी परंतु दत्तात्रय पुंडेनीच म्हटल्याप्रमाणे तांत्रिक अशी ही व्याख्या आहे. वाङ्मयेतिहासाची संकल्पना एकदा स्पष्ट झाली की आपणाला वाङ्मयाचे कालखंड किंवा विशिष्ट कालखंडातील वाङ्मय किंवा वाङ्मयाचा कालिक अभ्यास या संज्ञा स्पष्ट करणे सोपे जाते.

**2.3 कालखंड मानण्याचे निकषः**

वाङ्मयीन इतिहासाचे लेखन करीत असताना नेमके वाङ्मयीन कालखंड केव्हा मानावेत? ते कोणत्या निकषांवर असावेत? हे प्रश्नही खूप महत्त्वाचे असतात. तसेच या बद्दलचे प्रत्येकाचे दृष्टिकोन वेगवेगळे असू शकतात. राजकीय परिवर्तने होतात त्याला अनुसरून किंवा एका विशिष्ट टप्प्यावर एखाद्या लेखकाचा जो दबदबा निर्माण झालेला असतो त्यामुळे त्या लेखकाच्या कार्यकर्तृत्वाचा काळ गृहीत धरून वाङ्मयीन कालखंड मानले गेले आहेत परंतु असे कालखंड मानणे सयुक्तिक नाही असे आपणाला म्हणता येते. राजकीय घटनांचा साहित्यावर प्रभाव असतोच असे नाही. एखाद्या मोठ्या राजकीय घटनेचा साहित्यावरील परिणाम अत्यल्प असतो तर राजकीय दृष्ट्या जास्त महत्त्वाची नसलेल्या एखाद्या घटनेने साहित्याकांना मात्र खूपच प्रेरीत केलेले असते. लेखकांवरून कालखंड मानणेही ऐतिहासिक दृष्ट्या योग्य नाही कारण कोणताच कालखंड हा फक्त एका लेखकाचा नसतो त्याच्या जडणघडणीत देखील इतर अनेक लेखकांचा सहभाग असतो. उदा: आपल्याकडे 'फडके- खांडेकर युग' असे म्हणण्याची प्रथा आहे परंतु एकूण साहित्यिक मूल्यमापनाचा विचार करता, त्यांचे साहित्य भाबडे किंवा फक्त मनोरंजनात्मक ठरवले गेले आहे. त्यामुळे, लेखकांवरून कालखंड मानणे ही योग्य ठरत नाही. मग कालखंड मानावेत कसे, हा मोठा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नासंदर्भातले मार्मिक विश्लेषण दत्तात्रय पुंडे यांनी केले आहे. ते म्हणतात, "कोणताही इतिहास हा अखेरतः स्थित्यंतराचा इतिहास असतो आणि वाङ्मयेतिहासही याला अपवाद नाही. इतिहास म्हणजेच स्थित्यंतरांचा वेध. वाग्ङ्मयेतिहासाचे लक्ष म्हणून वाङ्मय स्थित्यंतराकडे पाहता येते. म्हणूनच वाङ्मयेतिहासामध्ये वाङ्मयीन स्थित्यंतर दिग्दर्शित करणाऱ्या महत्त्वपूर्ण वाङ्मयीन टप्प्यांवर कालखंड कल्पिणे रास्त ठरेल[2] वरील विश्लेषणांवरून वाङ्मयीन स्थित्यंतरे स्पष्टपणे दिसतात तेव्हा वाङ्मयीन कालखंड मानणे सयुक्तिक आहे असे आपणाला म्हणता येते. एकूण नव्वदोत्तर वाङ्मय ही संकल्पनेचा या संदर्भात विचार करता नव्वदोत्तर साहित्यात वाङ्मयीन स्थित्यंतरे अगदी स्पष्टपणे दिसू लागल्यामुळे विशेषतः कादंबरी वाङ्मयात ती अगदी ठळकपणे दिसू लागल्यामुळे कादंबरी लेखनासंदर्भात 'नव्वदोत्तर साहित्य' हा वेगळा कालखंड मानणे क्रमपात्र ठरते. अर्थात या स्थित्यंतरात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. नव्वदोत्तर कालखंडाचा विचार करीत असताना जागतिकीकरणाची जी प्रक्रिया नव्वदोत्तर काळात सुरू झाली त्याचा व त्यासोबत आलेल्या खाजगीकरण, उदारीकरण या गोष्टींचा परिणाम या कालखंडावर खोलवर झाला आहे. म्हणजेच जागतिक पातळीवर जे आर्थिक बदल झाले त्याचा परिणाम या कालखंडावर विशेषत्वाने जाणवतो असे म्हणता येते. या ठिकाणी नोंद करण्यासारखी गोष्ट म्हणजे आजपर्यंतच्या

वाङ्मयीन कालखंडांवर राजकीय वा सामाजिक घडामोडींचा ठळक परिणाम जाणवत होता पण पहिल्यांदाच आर्थिक परिवर्तनाचा वाङ्मयीन कालखंडावर परिणाम झाल्याचे जाणवते. या एकूण विवेचनावरून हे लक्षात येते की राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच वैचारिक परिवर्तनांचा परिणाम वाङ्मय निर्मितीवर होतो. त्यामुळे अशा घटनांना वाङ्मयाच्या कालिक अभ्यासात निश्चित महत्त्व आहे. वाङ्याचा कालिक अभ्यास करीत असताना तो मात्र ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात नव्हे तर तो वाङ्मयीन अंगाने झाला पाहिजे अन्यथा वाङ्मयाच्या अभ्यासापेक्षा तो सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यास जास्त होतो व यातून कालखंडाच्या मूळ अभ्यासाचा हेतू नष्ट होतो. एखाद्या कालखंडाचा अभ्यास हा राजकीय, सामाजिक, वैचारिक, आर्थिक, ऐतिहासिक घटना, सांस्कृतिक पार्श्वभूमी, अस्तित्वात असलेले विविध वाङ्मयीन प्रवाह, त्यातील परिवर्तने व या सर्व घटनांचा तत्कालीन वाङ्मय निर्मितीवर झालेला परिणाम अशा व्यापक स्वरूपात झाला पाहिजे. त्यात वाङ्मयीन बदलांचा, परंपरांचा व विचारांचा व यातून घडणाऱ्या क्रिया प्रक्रियांचा वाङ्मय सापेक्ष किंवा एखादा वाङ्मयय प्रकार निवडला असल्यास त्या वाङ्मय प्रकारांच्या संदर्भात साकल्याने आढावा घेणे शक्य झाले पाहिजे.वाङ्मयीन कालखंड मानत असताना वाङ्मय प्रकारानुसार हे कालखंड वेगवेगळे ठरू शकतात, हे ध्यानात ठेवले पाहिजे. काही नवीन गोष्टींचा उदय वाङ्मय क्षेत्रात होत असतो. काही नवीन संकल्पना विविध वाङ्मय प्रकारात विकसित होत असतात. त्याचप्रमाणे काही गोष्टींचा, संकल्पनांचा ऱ्हास देखील होत असतो. उदय- विकास ऱ्हासाचे चक्र सर्व वाङ्मय प्रकारात समान असते असे ही नाही, बहुदा ते समान नसतेच! काही संकल्पना एखाद्या वाङ्मय प्रकारात जास्त प्रभावी असतात व त्यांचा विकास त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होतो, त्यामुळे साहजिकच त्या वाङ्मय प्रकारात त्याचा प्रभाव दीर्घकाळपर्यंत राहतो, तर समकालीन दुसऱ्या वाङ्मय प्रकारात मात्र तो अल्पकालीन असल्याचे दिसते. काही वाङ्मय प्रकारात तो पुसटसाही दिसत नाही. उदा: 'नवकविता' ही संकल्पना मराठी कवितेच्या संदर्भात दीर्घकाळपर्यंत राहिली परंतु 'नवकथा' ही संकल्पना कथा क्षेत्रात अल्पकालिक ठरली तर कादंबरी क्षेत्रात 'नवकादंबरी' अशी संज्ञा कधी वापरलीच गेली नाही. म्हणजेच उदय - विकास - ऱ्हासाचे हे चक्र व त्यांचे काळ हे वाङ्मयीन प्रकारानुसार मागेपुढे असतात किंवा त्यांची परिणामकारकता वाङ्मयीन प्रकारानुसार कमी जास्त असू शकते. वाङ्मयीन कालखंडाच्या अभ्यासाच्या संदर्भात अनेक अभ्यासकांनी वाङ्मयाच्या अभ्यासात वाङ्मय निर्मितीची केंद्रे व वाङ्मयीन भूगोलाचा ही विचार आवश्यक असल्याचे म्हटले आहे. विशिष्ट कालखंडात एकूण वाङ्मय निर्मितीची व वाङ्मय व्यापाराची काही विशिष्ट केंद्रे कार्यरत होती असे दिसते. जेव्हा कालखंड बदलतो तेव्हा केंद्रे ही बदलतात असे दिसून येते. मराठी वाङ्मयाचा विचार केल्यास सुरुवातीच्या काळी पैठण हे वाङ्मय

निर्मितीचे महत्त्वाचे केंद्रे होते तर आधुनिक मराठी साहित्याचा विचार केल्यास पुणे किंवा मुंबई ही केंद्रे असल्याचे दिसते. प्रत्येक कालखंडाची जशी केंद्रे असतात तसेच या निर्मितीच्या संदर्भात वाङ्मयीन भूगोलही बदलत असतो हे लक्षात येते. हा वाङ्मयीन भूगोलाचा मुद्दा दुर्लक्षित करता येण्यासारखा नाही. उलट तो जास्त महत्त्वाचा आहे. कालखंडाच्या समग्र अभ्यासासाठी वाङ्मयाच्या भूगोलाचा अभ्यास अत्यावश्यक आहे. उदा; मराठी कादंबरीचा विचार करता प्रारंभीची कादंबरी पुणे मुंबई एवढ्या केंद्रीय भौगोलिक परिसराशी मर्यादित होती परंतु आजच्या मराठी कादंबरीचे क्षेत्र विस्तारले असून विशेषत: ग्रामीण भाग हा मराठी कादंबरीचा केंद्रबिंदू झाला आहे. आजची मराठीतील कादंबरी ही मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून लिहिली जाते. म्हणूनच आज मराठीत ग्रामीण कादंबरी ही एकूण मराठी कादंबरी वाङ्मयात केंद्रस्थानी असून, सर्वात महत्त्वाची ठरली आहे. वाङ्मयीन भूगोलानुसार साहित्याची भाषा बदलते हा विशेषत्वाने नोंद घेण्यासारखा मुद्दा आहे. आजच्या अगदी ग्रामीण कादंबरीचाच विचार केला तरी ती ज्या परिसरात घडते त्या परिसरातील भाषा त्या कादंबरीतून प्रवाही झालेली दिसते. उदा: कृष्णात खोत यांच्या ‘गावठाण’ या कादंबरीत कोल्हापूरातील पन्हाळा परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचा वापर करण्यात आला आहे तर प्रवीण बांदेकर यांच्या ‘चाळेगत’ मध्ये मालवणी बोलीचा वापर मोठ्याप्रमाणात करण्यात आला आहे.

**2.4 कालिक अभ्यासाचे प्रकार:**

वाङ्मयाचा कालिक अभ्यास करीत असताना आणखी एक गोष्ट आपण लक्षात ठेवणे गरजेचे आहे. जेव्हा आपण वाङ्मयाचा कालिक अभ्यास असे म्हणतो तेव्हा तो दोन प्रकारचा अभ्यास असू शकतो. 'वाङ्मयेतिहासातील कालखंडाचा अभ्यास' किंवा 'विविक्षित कालखंडाचा वाङ्मयीन अभ्यास' कालखंडाशी संबंधित असली तरी ही दोन्ही परस्पर भिन्न अशी अभ्यासक्षेत्रे आहेत. वाङ्मयतेतिहासातील एखादा कालखंड हा संपूर्ण वाङ्मयेतिहासाचा एक छोटा भाग असतो. अगोदरच्या आणि नंतरच्या कालखंडाची तो निगडित असतो व त्याचे या दोन कालखंडांशी असलेले नाते या अभ्यासातून दृग्गोचर व्हावे लागते. म्हणजे या अभ्यासात वाङ्मयाचा ऐतिहासिक पद्धतीनेच किंवा विकासक्रमाच्या दृष्टीने अभ्यास करावा लागतो. याउलट विविक्षित कालखंडाच्या अभ्यासात, ऐतिहासिक नातेसंबंध दाखविण्यापेक्षा निवडलेल्या कालखंडातील वाङ्मयाचे स्वरूप किंवा एखादा साहित्य प्रकार अभ्यासासाठी निवडला असल्यास त्या वाङ्मय प्रकारावर त्या कालखंडातील आगेमागे घडलेल्या घटनांचा कसा प्रभाव पडला आहे हे विश्लेषक पद्धतीने सांगणे अपेक्षित असते. या कालखंडाचे म्हणून जे काही विशेष असतात त्या विशेषांच्या प्रकाशात त्याकाळातील साहित्याचा अभ्यास अपेक्षित असतो. मी निवडलेल्या

अभ्यासात याच प्रकारे नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतला जाणार आहे. अर्थात विविक्षित कालखंडाच्या अभ्यासातही काही एक ऐतिहासिक विकास क्रमाची संगती किंवा पूर्वकालीन वाङ्मयाचा काहीएक संबंध दाखवणे क्रमप्राप्तच आहे. काही वेळा विविक्षित कालखंडाच्या अभ्यासातही पूर्वकालीन वाङ्मयाशी सांधेजोड करणारा तुलनात्मक अभ्यास आवश्यक असतो. विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासासाठी कालपट तयार करण्याची पद्धती आता अस्तित्वात आली असून ती बरीच उपयुक्त ठरत आहे . प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सहाव्या खंडाकरीता लेखन करीत असताना 1920 ते 1947 या कालखंडातील सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, कला इ. क्षेत्रातील विविध घटनांचे वैशिष्ट्यपूर्ण तपशील देणारा एक कालपट तयार केला आहे आणि त्याचे उपयोजन करून आपल्या प्रारंभिक लेखातील विविध निदाने व निकषांची नोंद केली आहे. हे वाङ्मयीन घटनांची उकल करून घेण्यासाठी एक प्रभावी माध्यम आहे कारण घडलेल्या घटना व त्याचे वाङ्मयातून उमटलेले पडसाद यांचा आपण या कालपटाच्या आधारे तुलनात्मक अभ्यास करू शकतो. कादंबरी सारख्या समाजनिष्ठ वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करीत असताना कालपट खूपच उपयुक्त ठरू शकतो. अर्थात, ज्या घटना घडतात त्या सर्व घटनांचा वाङ्मयाचा निर्मितीवर परिणाम होतोच असे नाही किंवा सर्व घटनांचा तात्काळ परिणाम होतो असे नाही. काही घटनांचा परिणाम साहित्यात बऱ्याच काळानंतर जाणवू शकतो, त्यामुळे कालपटाचा वापर हा तारतम्याने करावा लागतो. या संदर्भात फ्रान्सिस आर्. जॉन्सन यांनी दिलेला इशारा महत्त्वाचा आहे ते Literary History and History of Science या लेखात म्हणतात, "one persistent obstacles to the proper exercise of historical imagination, in studies that concern themselves with the impact of science upon literature, is the common tendency, to begin, with the assumption that the event in the progress of science that have come to seem of special significance to later period. Where perceived at the time to possess precisely the same significance they later acquired."[3] एखाद्या सिद्धांताचा शोध विशिष्ट काळी लागला तरी त्यामुळे माणसाचे वैचारिक आणि भावनिक जग बदलण्यासाठी बराच कालावधी लागतो. उदा: कोपर्निकसचा पृथ्वी गोल असण्यासंबंधीचा तसेच पृथ्वीच्या परिभ्रमणासंबंधीचा सिद्धान्त मान्य होण्यास शतक-दीड शतकाचा कालावधी जावा लागला. थोडक्यात सांगायचे म्हणजे, वैचारिक, सामाजिक सिद्धान्त आणि वांङ्मयीन परिवर्तने या गोष्टी समांतर असतातच असे नाही. प्रत्येक राजकीय सामाजिक सांस्कृतिक आर्थिक अशा सारख्या घटनांचा वांङ्मय निर्मितीवर परिणाम होतोच असेही नाही. उदा:१९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी

देशात आणीबाणी लागू केली. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळाच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व अशी राजकीय घटना होती. या घटनेमुळे तत्कालीन समाजजीवन व त्या सोबत कलेचे, साहित्याचे क्षेत्रही पूर्णपणाने ढवळून निघाले होते परंतु काही तात्कालिक अपवाद सोडल्यास या घटनेचे साहित्यात उमटलेले पडसाद अत्यंत क्षीण आहेत. कालपटाच्या उपयोजनासंदर्भात डॉ. दत्तात्रेय पुंडे यांनी वेगळा विचार मांडला आहे. ते म्हणतात, "कालपटाच्या उपयोजनाची पद्धत उलटच असायला हवी. वाङ्मय प्रवाहांचा अभ्यास करताना जेथे कोडी पडतात, गुंता वाढतो किंवा समस्या निर्माण होतात, तिथे कालपटाच्या अवलोकनातून ती कोडी, तो गुंता किंवा त्या समस्यांची उकल होते काय? हे पाहण्यासाठी ही पद्धत हवी. आपले लक्ष वांङ्मय वस्तूवर हवे व या वस्तूच्या अभ्यासासाठी आवश्यक तेथे तिच्या आजूबाजूच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैचारिक, कला क्षत्रिय परिसराचे प्रभाव, परिणाम लक्षात घ्यायचे" [4] अर्थात कालपटाच्या मांडणीतून ही वाङ्मयासंबंधीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळतीलच असे नाही पण एकूण त्या कालखंडात निर्माण झालेल्या वाङ्मयाची काही एक मांडणी करण्यास व निष्कर्ष काढण्यास ही पद्धत उपयुक्त ठरू शकते. कालिक संकल्पनेसंदर्भातील हे विश्लेषण लक्षात घेतल्यानंतर वाङ्मयाच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता काय आहे आणि त्याची दिशा काय असावी ते आपल्या लक्षात येते. बदलत्या काळानुसार ज्या राजकीय, सामाजिक,आर्थि, सांस्कृतिक इ. घडामोडी घडतात त्याचा वाङ्मय निर्मितीवर परिणाम होत असतो आणि त्यानुसारच वाङ्मयीन बदल घडत असतात. अर्थात, कोणत्या घटनेचा कितपत परिणाम होईल याबद्दल आपण कोणतेही ठोकताळे मांडू शकत नाही. फक्त झालेल्या बदलांची काळाच्या संदर्भात चिकित्सा करू शकतो. या वाङ्मयीन बदलांमागे वर उल्लेख केलेली अनेक कारणे असतात आणि त्या कारणांचा काळाच्या संदर्भात वेध घेतल्यास त्या बदलांमागची पार्श्वभूमी आपल्या लक्षात येते व त्या वाङ्मयाचा किंवा आपण अभ्यासासाठी एखादा विशिष्ट वाङ्मय प्रकार निवडला असल्यास त्या प्रकारात काळानुरूप झालेल्या बदलांची कारण मीमांसा करून, त्या बदलांचे स्वरूप आपण जाणून घेऊ शकतो. या सर्व पार्श्वभूमीवर आपणाला मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये कालानुरूप जे बदल होत गेले त्याचे विश्लेषण करायचे आहे. तसेच नव्वदोत्तर काळातील मराठी ग्रामीण कादंबरीच्या लेखनाचे बदललेले स्वरूप आणि आज कालौघात मराठी कादंबरी कोणत्या वळणावर उभी आहे याचा आढावा देखील घ्यायचा आहे.

### 2.5 ग्रामीण मराठी कादंबरीचा कालिक आढावा:

मराठी ग्रामीण कादंबरीचा कालिक (ऐतिहासिक) आढावा घेत असताना आपणला हे लक्षात घेतले पाहिजे की, साहित्य निर्मिती करणारा साहित्यिक हा एक संवेदनशील प्राणी असतो तसेच तो त्या काळात घडणाऱ्या विविध

घटनांचा, प्रसंगांचा साक्षीदार असतो व एकूणच तत्कालीन समाजाच्या परिस्थितीचे एक आकलन त्यांने केलेले असते. आपल्या आकलनानुरूप अशी आपली निर्मिती तो करीत असतो. अनुभव घेणे आणि ते नोंदवणे या दोन्ही प्रक्रिया वाटतात तेवढ्या सोप्या नाहीत. आपण घेतलेला अनुभव आपल्या सर्जनशील मनाच्या स्पर्शाने त्याला नवे रूप देऊन त्याचा एक नवीन रूपबंध तयार करून लेखक आपली निर्मिती करीत असतो. त्याची निर्मिती ही त्याच्या अनुभवाच्या मुशीतून निर्माण होते व त्याच्या आकलनानुसार तिला एक वेगळे रूप प्राप्त होते. तत्कालीन घटना, परिस्थिती आणि त्याला मिळालेले वाङ्मयीन रूप यांचा संबंध गणिती स्वरूपाचा नसतो तर तो अत्यंत जटील अशा मानसिक प्रक्रियेतून आकराला आलेला असतो. वाङ्मयाचा ऐतिहासिक आढावा घेत असताना; तत्कालीन घटना परिस्थितीचा संदर्भ लावायचा तर तो अत्यंत तारतम्याने लावला पाहिजे हे लक्षात ठेवले पाहिजे. मराठी कादंबरीचा विचार करता हा साहित्यप्रकार इंग्रजी साहित्याच्या परिशीलनांतून मराठीत आला हे सर्वज्ञात आहे त्यामुळे कादंबरीचा किंवा कादंबरीच्या कोणत्याही एका विशिष्ट प्रकाराचा अभ्यास करायचा असेल तरी हा मूळ प्रकार पाश्चात्त्य साहित्यातून मराठीत आला आहे, याचे भान कायम ठेवावे लागते. कादंबरी या साहित्याचा रूपबंध हा तेथे तयार झाला आहे व नंतर आपण तो स्वीकारला आहे. त्यामुळे मराठीत लिहिल्या गेलेल्या या प्रकारच्या साहित्याची स्वरूपनिश्चिती करीत असतना त्याचा मूळ रूपबंधच आपल्या समोर असतो हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. कादंबरी सारख्या वाङ्मयप्रकाराची स्वरूप निश्चिती करणे ही आणखी जटील गोष्ट आहे. कादंबरी हा सर्वसमावेशक असा वाङ्मय प्रकार आहे, तो अत्यंत लवचीक असा वाङ्मयप्रकार देखील आहे त्यामुळे त्याची स्वरूप निश्चिती करणे वाटते तेवढे सोपे नाही. संस्कृतमधील महाकाव्ये किंवा मराठीतील बखर सदृश वाङ्मय या सर्वांकडे आपण भारतीय साहित्य परंपरेच्या संदर्भात कादंबरीची पूर्वपीठिका म्हणून पहातो. इंग्रजी साहित्याच्या परिचयातून जे गद्य लेखन आपल्याकडे झाले त्यातील कोणत्या लेखनाला कादंबरी म्हणावे आणि कोणत्या स्वरूपाच्या लेखनाला म्हणू नये याबद्दल वाद निर्माण झाले आहेत. आज आपण 1857 मध्ये प्रसिद्ध झालेली 'यमुना पर्यटन' या कादंबरीला मराठीतील पहिली कादंबरी असे म्हणत असलो तरी वि.का. राजवाड्यांसारख्या तत्कालीन महत्वाच्या अभ्यासकाने आपल्या कादंबरीविषयक विश्लेषणात या कादंबरीचा कादंबरी म्हणून उल्लेख केलेला नाही, हे या संदर्भात नोंद घेण्यासारखे आहे. एकूणच, कादंबरी हा वाङ्मयप्रकारच मराठीत नव्याने अवतरला असल्याने व आपण तर कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या ‘ग्रामीण कादंबरी’ या एका उपभागाचा अभ्यास करीत असल्याने, या प्रकराचा ऐतिहासिक दृष्ट्या आढावा घेताना या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. ज्या  वेळी 'यमुना पर्यटन' हे कादंबरीच्या पारंपरिक चौकटीत न

बसणारे पण कादंबरी सदृश लेखन केले जात होते जे सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे होते. त्याच काळात, कादंबरीच्या पारंपरिक चौकटीत बसणारे पण फक्त मनोरंजन हे मूल्य असलेल्या अद्भुतरम्य कादंबऱ्या लिहिण्यांचे पेव फुटले होते. मोचनगड या कादंबरीच्या रुपाने ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन देखील सुरू झाले होते. ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबऱ्यांचे लेखनही इतिहासापेक्षा कपोलकल्पित मनोरंजनात्मक असेच होते. त्यामुळे सुरूवातीच्या काळातच कादंबरी लेखनाचे अनेक प्रवाह मराठी कादंबरी लेखनात निर्माण झाले.

### 2.5.1 ग्रामीण कादंबरी लेखनाच्या प्राथमिक खूणाः

मराठीतील ग्रामीण कादंबरी लेखनाच्या प्राथमिक खूणा आपणाला याच काळात शोधता येतात. म.फुल्यांच्या सत्यशोधक सळवळीतून वर आलेल्या कृष्णाराव भालेकर यांनी 1888 मध्ये 'बळीबा पाटील' या नावाने कादंबरी सदृश लेखन केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे रुचिपालट म्हणून केलेले हे लेखन नव्हते तर अन्यायामुळे सामान्य लोक कसे दिशाहीन झाले आहेत, त्यांच्या अज्ञानाचा फायदा उच्चवर्णीय कसा घेत आहेत, कष्टकरी समाजाचे विशेषतः शेतकऱ्यांचे शोषण कसे होत आहे, हे सर्व लक्षात घेऊन एक निश्चित भूमिका घेऊन त्यांनी हे लेखन केल्याचे दिसते. म. फुल्यांच्या विचारांची बैठक देखील या लेखनाला आहे. 'बळीबा पाटील आणि 1857 चा दुष्काळ' या नावाने हे मूळ लेखन 'दीनमित्र' या त्यांनीच चालवलेल्या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले होते. 'बळीबा पाटील आणि 1857 चा दुष्काळ' या कादंबरीचा नायक बळीबा पाटील हा पंचाण्णव वर्षांचा वृद्ध आहे. अत्यंत व्यापक विचारांचा असलेला बळीबा दुष्काळावर व शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी गावातील सर्व जाती-धर्माच्या लोकांची सभा बोलावतो या सभेतील चर्चा म्हणजे ही कादंबरी आहे. 'बळीबा पाटील आणि 1857 चा दुष्काळ' या कादंबरीतून ग्रामीण जीवनांतील तत्कालीन समस्या चित्रित झाल्या आहेत. शेतीच्या कामांची माहिती आली आहे. शेतकऱ्यांचे हालाखीचे जीवन चित्रित झाले आहे. त्याचप्रमाणे, या गावकऱ्यांना लुटणाऱ्या पाटील, कुलकर्णी यांची वर्णने ही आली आहेत. एकूण कादंबरीची चौकट लक्षात घेता कदाचित हे लेखन कादंबरी म्हणून स्वीकारणे आज शक्य वाटत नाही म्हणूनच डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी "एकंदरीत बळीबा पाटील या कादंबरीच्या प्रारंभीच्या भागातून ग्रामीण वातावरणाचा आणि गावगाड्याचा काहिसा प्रत्यय येतो. अर्थात कादंबरी सारख्या वाङ्मय प्रकारातून ज्या भरघोसपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय यायला पाहिजे तसा प्रत्येक येथे येत नाही, एवढे मात्र खरे. एवढ्या सगळ्या मर्यादा मान्य करूनही मराठीतला हा पहिला प्रयत्न आहे असे नोंदवायला हरकत नाही." असे म्हटले आहे.[5] ग्रामीण साहित्याचे आणखी एक प्रमुख भाष्यकार डॉ. आनंद यादव यांनी तर 1903 मध्ये प्रसिद्ध झालेल्या व धनुर्धारी उर्फ रामचंद्र विनायक टिकेकर यांनी

लिहिलेल्या 'पिराजी पाटील' या कादंबरीला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हटले आहे. "पिराजी पाटील ही धनुरधारी (रामचंद्र विनायक टिकेकर) यांनी 1903 साली प्रसिद्ध केलेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते. तेरा प्रकरणे असलेली 130 पानांची, क्राऊन आकाराची ही कादंबरी आहे. छोटेखानी असली तरी ती अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे.[6] या ठिकाणी दोन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. नागनाथ कोत्तापल्ले 'बळीबा पाटील' हे लेखन म्हणजे मराठी ग्रामीण कादंबरी लेखनाचा पहिला प्रयत्न असे म्हणतात, म्हणजे ते त्याला प्रत्यक्ष कादंबरी समजत नाहीत. आनंद यादव तर 'पिराजी पाटील' हीच मराठीतील पहिली कादंबरी मानतात म्हणजे ते 'बळीबा पाटील' या नावाने जे लेखन केले गेले आहे त्याला अजिबातच कादंबरीसदृश लेखन मानत नाहीत. या ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. 'बळीबा पाटील' लिहिली गेली तो काळ हा मराठी कादंबरी लेखनाचा आरंभिचा काळ आहे. मराठीतील पहिली कादंबरी म्हणून ज्या कादंबरीचा उल्लेख केला जातो ती 'यमुना पर्यटन' 1857 मध्ये लिहिली गेली व 'बळीबा पाटील' ही 1888 मधील कादंबरी आहे. म्हणजे या दोन कादंबरी लेखनामधील काळ जेमतेम तीस वर्षांचा आहे. पाश्चात्त्य देशात विकसित झालेल्या व तोपर्यंत साधारणतः मराठीत स्थिरस्थावर झालेल्या, कादंबरी लेखनाच्या स्वरूपाचा विचार करता, त्या स्वरूपात न बसणारी व धर्म प्रचाराच्या वाङ्मयबाह्य हेतूने लिहिलेली 'यमुना पर्यटन' ही आज कादंबरी म्हणून गणली जात आहे. तत्कालीन विधवांच्या हालाखीच्या अवस्थेला उद्गार देणारी म्हणूनच सामाजिक दृष्ट्या ती महत्त्वाची असल्यामुळे, कादंबरीच्या रचनातंत्रात न बसता देखील तिला मराठीतील पहिली कादंबरी म्हटले जाते. खरेतर, ती रचनातंत्रात बसत नसल्याने व वाङ्मय बाह्य हेतूने लिहिली असल्याने वि. का. राजवाडे व का. बा. मराठे यांनी कादंबरीवरील आपल्या लेखात तिचा उल्लेख केला नव्हता. भालचंद्र नेमाडें सारख्या ज्येष्ठ समीक्षकांनी मात्र मराठीतील पहिली कादंबरी म्हणून तिचा गौरव केला आहे कारण ती तत्कालीन सामाजिक प्रश्नांवर भाष्य करते. हाच निकष लावायचा असेल तर, सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या अशा शेतकऱ्यांच्या दारूण अवस्थेवर आधरलेली, त्यांच्या प्रश्नांना  वाचा फोडणारी 'बळीबा पाटील' या कादंबरीला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणण्यास काहीच प्रत्यावाय नसावा.  कादंबरी लेखनाच्या कालिक संदर्भाचा विचार करता म. फुल्यांचे विचार आणि त्या विचारांना अनुसरून अगदी प्रारंभीच्या काळी झालेले या कादंबरीचे लेखन हा संदर्भ देखील महत्त्वाचा आहे. हा मराठी कादंबरी लेखनाचा प्रारंभीचा काळ आहे. व सगळयात महत्त्वाचे म्हणजे नंतरच्या काळात सुरू झालेल्या ग्रामीण साहित्य चळवळीने आपले प्रेरणास्थान म्हणून म. जोतिबा फुले यांचाच उल्लेख केला आहे. त्यांच्या विचारांवर आधारलेली ही कादंबरी आहे. 'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी

म्हणून मान्य करणारे डॉ. कोत्तापल्ले वा डॉ. यादव यांसारखे अभ्यासक 'बळीबा पाटील' या कादंबरीला ती ग्रामीण पार्श्वभूमीची असूनही तिला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून का मानत नाहीत, हे लक्षात येत नाही. नंतरच्या काळात लिहिली गेलेली कादंबरी म्हणजे 'पिराजी पाटील' जी 1903 मध्ये लिहिली गेली. म्हणजे 'बळीबा पाटील' या कादंबरीचे लेखन झाल्यानंतर पंधरा वर्षांनी ही कादंबरी लिहिली गेली. ग्रामीण स्वरूपाच्या या दोन कादंबऱ्यांच्या निर्मिती मध्ये एवढा कालवधी का, हा प्रश्न निश्चितच निर्माण होतो. याची कारणेही कालिक संदर्भातच सापडतात. एकूण कादंबरी लेखनाची जाणच मराठी साहित्यात नव्याने निर्माण होत होती व हे कादंबरीलेखन तत्कालीन सुशिक्षित लोक आणि ज्यांचा इंग्रजी वाङ्मयाशी काही एक संदर्भ आला आहे असे लोकच करीत होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हे सर्व लेखन मध्यमवर्गीय जीवन जाणिवा व्यक्त करणारे होते. त्यांच्या नित्याच्या जीवनाचे जे चित्र ते पहात होते, ज्या सामाजिक समस्या ते अनुभवत होते, त्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांचे एकूण लेखन होत होते. म. फुलेंनी आपले क्रांतिकारक विचार मांडले असले तरी ते सामान्य माणसापर्यंत अजूनही पोचलेले नव्हते. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षणाची गंगा अजून बहुजन समाजापर्यंत दीन- दलितांपर्यंत पोहचलेली नव्हती. या ठिकाणी कालिकदृष्या आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याची नोंद घेतली पाहिजे 1857 ते 1900 या काळाचा विचार करता तीन भिषण दुष्काळ या काळात महाराष्ट्राने अनुभवले आणि दुषकाळाच्या काळत सर्वात जास्त फरफट झाली ती शेतकऱ्यांची आणि दलितांची. अनेकाना आपले प्राण गमवावे लागले. ही अशी हालाखीची परिस्थिती निर्माण झाली असताना, ग्रामीण माणूस शिक्षण किंवा तत्सम इतर गोष्टींकडे लक्ष देण्याच्या मानसिकतेत होता असे दिसत नाही. पहिला ग्रामीण कादंबरी लेखनाचा प्रयत्न हा जाणीवपूर्वक व विशिष्ट तत्त्वज्ञान स्वीकारून झाला होता असे निश्चितपणे म्हणता येते परंतु या दुसऱ्या प्रयत्नाबद्दल असे ठामपणे म्हणता येत नाही. अर्थात फुल्यांच्या विचारसरणीचा काही एक प्रभाव या कादंबरीवर देखील आहे. चौकटीच्या बाहेरचे काहीतरी लिहावे म्हणूनही अशा विषयावरचे लेखन धनुर्धारी यांनी केले असावे. पिराजी पाटील लेखकाला एका रेल्वे स्टेशनवर भेटतो व वाताहात झालेल्या कुटुंबाची तसेच वाताहात झालेल्या आपल्या गावची कहाणी लेखकाला सांगतो, असे या कादंबरीचे कथानक आहे. हा पिराजी पाटील आपल्या लोकांना अन्न मिळावे त्यांनी गाव सोडू नये म्हणून खूप धडपडतो, परंतु त्याचे प्रयत्न अपुरे पडतात. आसमानी संकट तर असतेच पण अन्नाची लालूच दाखवून लोकांचे धर्मांतर करू पाहणाऱ्या ख्रिश्चन धर्मप्रसारकांचे संकटही तेवढेच मोठे असते. एकूण तत्कालीन खेड्यात निर्माण झालेल्या भयावह परिस्थितीचे चित्रण या कादंबरीतून चित्रित झाले आहे. चौकटी बाहेरचा विषय हाताळावा म्हणून धनुर्धारीनीं हा विषय

निवडला असे म्हणण्यास वाव असला तरी, तत्कालीन ग्रामीण जीवनाच्या हालाखीची स्थिती त्यांना पूर्णपणे अवगत होती आणि हे सर्व त्यांच्या संवेदनशील मनाने टिपल्याने मनात निर्माण झालेल्या अस्वस्थतेतून ते या लेखनासाठी प्रवृत्त झाले असावेत, असेही म्हणता येते. महत्त्वाचे म्हणजे, हे लेखन त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने केले असून केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर मानवतेच्या कळवळ्यातून हे लेखन झाले आहे याची प्रचिती हे लेखन वाचताना येते. तत्कालीन परिस्थितीचे त्यांनी केलेले सूक्ष्म अवलोकन या लेखनातून जागोजागी प्रत्ययाला येते. म्हणूनच प्रारंभिच्या काळातील असली तरी कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप आणि या वाङ्मय प्रकाराचे सामर्थ्य समजून घेऊन धनुर्धारी यांनी हे लेखन केले आहे असे निश्चितपणे म्हणता येते. 1857 नंतर 1903 आणि त्यानंतर 1920 अशा 63 वर्षांच्या काळात फक्त दोन ग्रामीण म्हणता येतील अशा कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. 1857 ते 1903 पर्यंतच्या फक्त एकच कादंबरी लिहिली गेल्याची जी कारण मीमांसा केली आहे ती एकूण या साठ वर्षांच्या काळालाही लागू पडणारी आहे. 1900 ते 1920 हा काळ राजकीय धामधुमीचा काळ होता. त्याच बरोबर सामाजिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत याचा हिरीरीने पुरस्कार करणारे गोखले याच काळात होऊन गेले तर आगरकरांच्या सामाजिक चिंतनाचा काही एक प्रभाव देखील होताच परंतु या राजकीय किंवा सामाजिक सुधारणांची व्याप्ती मध्यमवर्गीय चौकट मोडून ग्रामीण भागातील बहुजनापर्यंत पोहचली नाही. तसेच, म. जोतिबा फुलेंसारखे नेतृत्व या काळात बहुजन समाजातून उभे राहिले नाही याचीही नोंद घेतली पाहिजे. एकूण काळ आणि त्या काळात निर्माण झालेले साहित्य याचा आढावा घेताना या सर्व गोष्टींची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते. ग्रामीण कादंबरीचा कालिक विचार करताना या कालाच्या संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे यांनी व्यक्त केलेले मत मुद्दामहून नोंदविले पाहिजे ते म्हणतात, "1920 च्या पूर्वीचा कालखंड म्हणजे आधुनिक वाङ्मयाच्या निर्मितीचा प्रारंभाचा कालखंड होता. शिक्षणाचा प्रसार उच्च किंवा मध्यमवर्गीयांच्या पलीकडे गेलेला नव्हता. त्यातून लेखन करणारी मंडळी ही बहुतेक पांढरपेशा वर्गातील व मोजक्या अशा शहरातून नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने राहणारी होती. आपण राहतो त्या पांढरपेशा नागर जीवनापलीकडेही एक विशाल, विस्तीर्ण अशा ग्रामीण जीवन आहे आणि या जीवनातील सुख-दुःख, समस्या हेही लेखन विषय होऊ शकतात याची फारच थोड्यांना जाणीव होती. शिवाय त्यांच्या अनुभवांनाही नागर जीवनाच्या मर्यादा होत्या. म्हणून सत्तर-ऐंशी टक्के खेडी असलेल्या या देशातील आणि महाराष्ट्रातील ग्रामजीवनाचे चित्रण साहित्यात अभावानेच केले जात होते."[7] एकूणच 1920 पर्यंतचा काळ हा एकूण मराठी कादंबरी लेखनाचा स्थिरस्थावर होण्याचा काळ आहे. मराठी ग्रामीण कादंबरीचा

विचार करता ती अगदीच बाल्यावस्थेत होती असे म्हणता येते. मराठी ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने 1920 नंतरच्या काळातच लिहिली जाऊ लागली हे निश्चितपणे सांगता येते.

**2.5.2 1920 ते 1960 या कालखंडातील ग्रामीण मराठी कादंबरी**

१९२० नंतरचा काळ हा अनेक दृष्टने महत्त्वाचा आहे.राजकीय उलथापालथी या काळात झाल्याच, त्याचबरोबर सामाजिक सुधारणांनाही नवीन गती मिळाली. म.गांधींच्या रूपाने एक सर्वसमावेशक असे नेतृत्व उदयाला येऊ लागले होते. भारत हा खेड्यांचा देश आहे हे ओळखून त्यांनी तरूणांना 'खेड्याकडे चला' हा दिलेला मंत्र अत्यंत प्रभावी ठरला. साहित्य लेखनाला देखील हा मंत्र नवीन ऊर्जा देणारा ठरला. खेड्याकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनात बदल झाला व एका सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोनातून खेड्यांकडे पाहिले जाऊ लागले. याच काळात, मार्क्सवादी विचारांचा प्रभावही तत्कालीन तरूणांवर पडला. रशीयन राज्यक्रांतीचा तो परिणाम होता. मार्क्सवादी विचारधारा ही जीवनवादी आणि कामगार केंद्री असल्यामुळे शेतकऱ्यांकडे त्यांच्या प्रश्नांकडे, जीवनाकडे बघण्याची एक वेगळी दृष्टी या विचारधारेने दिली. या दोन्ही घटना नव्या स्वरूपाच्या साहित्यनिर्मितीलाही पोषक अशाच होत्या. त्यामुळेच, 1920 नंतरच्या काळात ग्रामीण प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून काही कादंबऱ्यांचे लेखन झाल्याचे दिसते. या काळात छत्रपती शाहू महाराज व भाऊराव पाटील यांनी खेड्यापाड्यातील गरीब,कष्टकरी, बहुजन समाजातील लोक व स्त्रियांच्या शिक्षणासाठी देखील जे प्रयत्न केले गेले त्यातून हळूहळू शिक्षणाचा प्रसार होऊ लागला व पुढील काळात ज्यांनी प्रत्यक्षात ग्रामजीवन अनुभवले ते हात लिहिते झाल्याचे दिसते. त्यामुळे खऱ्या अर्थाने ज्याला ग्रामीण साहित्य म्हणता येईल ते 1950 नंतरच्या काळातच लिहिले जाऊ लागले. ग्रामीण कादंबरी लेखक म्हणून बा.सी. मर्ढेकर यांचा सहसा कोणी उल्लेख करीत नाही.पण कालिकदृष्ट्या जेव्हा आपण मर्ढेरांच्या तांबडी माती (1943) आणि पाणी (1948) या कादंबऱ्यांकडे पाहतो तेव्हा आधुनिकीकरणांमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या ग्रामसंस्कृतीचे प्रत्ययदर्शी चित्रण करणारे ग्रामीण कादंबरीकार म्हणून आपणाला त्यांच्याकडे पहावे लागते. तत्कालीन ग्रामसंस्कृतीचे वास्तवदर्शन आपणाला त्यांच्या कादंबऱ्यांमधून घडते. विभावरी शिरूरकर यांनी लिहिलेली 'बळी' ही देखील ग्रामीण वाङ्मयाच्या कालिक अभ्यासात महत्त्वाचा टप्पा असलेली कादंबरी आहे. मांग-गारूडी या समाजाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेलेली ही कादंबरी आहे. असा प्रयत्न या अगोदरच्या काळात झालेला दिसत नाही. श्री. ना. पेंडसे व गो. नी. दांडेकर यांनी प्रादेशिक मराठी कादंबरी लेखनाचा प्रवाह सशक्त केला. प्रादेशिक कादंबरीला ग्रामीण कादंबरी म्हणावे का? हा महत्त्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करता येईल. ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबऱ्या काही एक मर्यादेपर्यंत सख्य सांगणाऱ्या असल्या तरी

ग्रामीण आणि प्रादेशिक या कादंबऱ्यांमध्ये भेद निश्चितच आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण किंवा प्रादेशिक हे वाङ्मयीन निकष आहेत असे म्हणता येत नाही अर्थात, ही विशेषणे असली तरी त्यातून एक निश्चित असा मूल्यभाव व्यक्त होतो त्यामुळे यातील भेद लक्षात घेणे आवश्यक आहे. विशिष्ट प्रदेश नजरेसमोर ठेवून ज्या कादंबरीची निर्मिती झालेली असते किंवा एखादा प्रदेश त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह त्या कादंबरीतून व्यक्त होत असेल तर त्या कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल.  कृषी आणि कृषी आधारित निर्माण झालेल्या व्यवस्था आणि ज्यातून प्रदेश नव्हे तर ग्रामसंस्कृतीचे दर्शन होते त्यालाच ग्रामीण कादंबरी म्हणता येते. या संदर्भात डॉ. एकनाथ पगार यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "प्रादेशिकतेचा संदर्भ निसर्गनियत जीवनदर्शनाशी आहे. तर ग्रामीणतेचा संदर्भ ग्रामीण व्यवसाय आणि ग्रामसंस्थांशी आहे. विशिष्ट भूप्रदेश, तेथील लोकसंस्कृती, लोकसमूहमानस, बोली, इतिहास, भौतिक सृष्टी व प्रादेशिक जीवनदृष्टी या सर्वांचे संस्कार प्रादेशिक साहित्यावर असतात. माणसाचे रंगरूप, स्वभावधर्म, कष्ट, आनंद, उत्सव,जीवनराहटी, यांच्यावर प्रादेशिकतेचा परिणाम झालेला असतो. ग्रामीणता येते ती कृषिकेंद्री जीवनव्यवहारातून आणि शेती निगडीत जीवनव्यवहारातून, ग्रामीणतेला गावाचा संदर्भ आहे. खेडे असणे, शेती करणे, गावगाडा असणे, विशिष्ट श्रद्धा-अंधश्रद्धांचे अनुकरण करणे, शेतीवर अवलंबून असल्याने पाऊस,पाणी,पिके, गुरेढोरे, माती यांच्याबद्दल श्रद्धाभाव असणे, अशा संवेदनेतून, भावनेतून ग्रामीणता अधोरेखित करता येते.[४] हे विश्लेषण ग्रामीण व प्रादेशिक यामधील भेद स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. श्री. ना. पेंडसे वा गो.नी. दांडेकर यांनी एखादा वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश तेथील प्रादेशिक वैशिष्ट्यांसह आपल्या कादंबऱ्यांतून जीवंतपणे चित्रित केला आहे त्यामुळे त्यांचे स्वरूप प्रादेशिक कादंबऱ्यांचे आहे त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना ग्रामीण कादंबऱ्या म्हणणे कठीण आहे. अर्थात गो.नी. दांडेकरांच्या 'माचीवरला बुधा' व 'पडघवली' या दोन कादंबऱ्यांचा ग्रामीण कादंबऱ्या म्हणूनही विचार करता येणे शक्य आहे. ग्रामीण मराठी कादंबरीच्या प्रवाहातील एका महत्त्वाच्या टप्प्यावयची कादंबरी म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीचा उल्लेख करता येतो. एका गावालाच नायक बनवून लिहिलेली छोटेखानी पण अत्यंत प्रत्ययदर्शी अशी ही कादंबरी आहे.  माणदेशातील एका उजाड, अभावग्रस्त खेड्यात राहणाऱ्या माणसांचे चित्रण या कादंबरीच्या माध्यमातून झाले आहे. दलित आणि ग्रामीण यांच्या सिमारेषेवरील कादंबरी म्हणून अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीचा उल्लेख करता येईल. 1920 ते 1960 या काळात कालिकदृष्या पहात असताना लेखनाचे कोणते महत्त्वाचे टप्पे आले याचे अवलोकन करताना वर उल्लेख केलेल्या सर्व कादंबऱ्या म्हणजे ग्रामीण कादंबरी लेखनात झालेल्या परिवर्तनाचा एकेक टप्पा म्हणूनही

पहाता येतो. उद्धव शेळके यांची 'धग' ही या टप्प्यातील सर्वात महत्त्वाची ग्रामीण कादंबरी म्हणून उल्लेख करता येईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, ही कादंबरी म्हणजे मराठी ग्रामीण कादंबरी लेखनातील मैलाचा दगड ठरलेली कादंबरी आहे. मराठी ग्रामीण कादंबरीला तिचा खरा चेहरा मिळवून देण्याचे कार्य या कादंबरीने केले. या ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण परिसरात राहणाऱ्या एक स्त्रिच्या संघर्षाची कथा अत्यंत वास्तवदर्शी स्वरूपात या कादंबरीतून लेखकाने मांडली आहे. ग्रामीण जीवनाचे एवढे वास्तवपूर्ण चित्रण तो पर्यंत मराठी ग्रामीण कादंबरीत आलेले नव्हते. महत्त्वाचे म्हणजे फडके- खांडेकरांच्या प्रभावापासून पूर्णपणे अलिप्त राहून व आपल्या अनुभवांना आणि आपल्या जगण्याला प्रमाण मानून या कादंबरीचे लेखन झाले आहे. या कादंबरी संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे यांनी नोंदविलेला अभिप्राय महत्वाचा आहे ते म्हणतात, " या कादंबरीत शहर विरुद्ध खेडे असा संघर्ष येत नाही. तरीही यंत्र युगाचे खेड्यांवर होणाऱ्या परिणामांचे, ग्रामीण विभागातील सर्वसामान्यांच्या जीवनावर होणाऱ्या शोकात्मक परिणामांचे तरल परंतु प्रभावी चित्रण येथे उद्धव शेळक्यांनी केले आहे. [९] १९६० नंतरच्या काळात एकूणच ग्रामव्यवस्थेत जे बदल झपाट्याने झाले व त्याचे चित्रण नंतरच्या कादंबरी लेखनात झाले त्याची नांदी म्हणूनही या कादंबरीकडे पहाता येते.

**2.6 स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागावर परिणाम करणारे घटकः**

वाङ्मयाच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता लक्षात घेताना स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागावर परिणाम करणारे असे जे काही बदल जाले त्यांचा एक थोडक्यात आढावा घेणे उपयुक्त ठरते कारण त्यामुळे कालिक बदल आणि त्या अनुषंगाने वांङ्मयनिर्मितीवर त्या घटनांचा होणारा परिणाम याची काही एक संगती आपणाला लावता येते. महात्मा गांधींचे सर्वव्यापी नेतृत्व व त्यामुळे गावपातळीवर झालेले बदल व नव्या विचाराना मिळालेली चालना ही एक क्रांतिकारी घटनाच आहे. त्यामुळेच गांधी हत्येनंतर ग्रामीण भागात ब्राह्मणांच्या घरांची झालेली जाळपोळ व ब्राह्मणांचे शहरी भागत मोठ्याप्रमाणात झालेले स्थलांतरण ही देखील ग्रामीण परिसरावर परिणाम करणारी महत्वाची घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समतावादी चळवळ व त्यातून दलित वर्गात निर्माण झालेली विद्रोहाची भावना व यातूनच पारंपरिक दलितांनी नाकारलेली बलुतेदारीची पद्धत, दलितांच्या हक्कांसाठी झालेल्या विविध चळवळी आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर या घटना एकूण गाव व्यवस्थेवर मूलगामी परिणाम करणाऱ्या होत्या. 1950 नंतरच्या काळात पंचवार्षिक योजनांना सुरूवात झाली आणि या योजनांमधून ग्रामविकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे ग्रामीण परिसरात नवीन विकास प्रकल्प सुरू झाले. हरितक्रांतीचा घेतलेला ध्यास, मोठमोठ्या धरण

योजना, कृषिविद्यापीठांची स्थापना करून कृषी संशोधनावर दिलेला भर. या सर्वांमुळे ग्राम विकासाला निश्चितच चालना मिळाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या काळात ग्रामीण परिसरात शिक्षणाचा प्रसार मोठ्याप्रमाणात झाला त्यामुळे आजपर्यंत वंचित असलेला बहुजन, दलित समाज शिक्षण घेऊ लागला. 1962 नंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा संस्था अस्तित्वात आल्या त्यामुळे आजपर्यंत सत्तेपासून दूर असलेल्या लोकांच्या मनात सत्तेचा अंकुर फोफावू लागला व यातूनच गावात राजकारण शिरले. सहकार चळवळ ही खरेतर एका उदात्त हेतूने सुरू झालेली चळवळ पण यातही राजकारणाने प्रवेश केला व या सहकारी संस्था म्हणजे राजकीय अड्डे झाले. त्याचे ग्रामजीवनावर जे परिणाम झाले त्याचे दर्शन आपणाला नंतरच्या साहित्यातूनही दिसते. शेतीच्या आधुनिकीकरणालाही याच काळात सुरूवात झाली. लाकडी नांगरांऐवजी लोखंडी नांगर आले व नंतर ट्रेक्टर आले. मोटा गेल्या व डिझेलवर व वीजेवर चालणारे पंप आले. पिठाच्या गिरण्या आल्या त्यामुळे दळणे-कांडणे इतिहासजमा झाले. अनेक नवीन सुधारणानी ग्रामजीवनात शिरकाव केल्याने पारंपरिक कृषिआधारीत ग्रामसंस्कृतीत क्रांतिकारक परिवर्तने आली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन होऊ लागले व सुशिक्षित झालेली शेतकऱ्यांची मुले शहराकडे नोकरीनिमित्ताने धाव घेऊ लागली. नोकरीत निश्चित पैसा मिळत असल्याने नोकरीला प्रतिष्ठा मिळू लागली व शेती ही कमी प्रतिष्ठेचीच नव्हे तर अप्रतिष्ठेची ठरू लागली. दलितांचा सुशिक्षित वर्गही शहराकडे जाऊ लागला. ग्रामीण जीवनातील पारंपरिक जत्रा, कुस्तीचे फड, तमाशा, बैलगाड्यांच्या शर्यती, पारंपरिक लोकरिवाज, लोकसण यांना उतरती कळा लागली किंवा ते नाममात्र राहिले व चित्रपट, फॅशन यांना अतोनात महत्त्व प्राप्त झाले. नव्वदोत्तर काळात घराघरात पोहचलेल्या टिव्हीने ग्रामजीवन पूर्णपणे बदलवून टाकले. खरेतर, रेडिओ ग्रामजीवनात साठ-सत्तरच्या दशकातच पोहचला होता परंतु रेडिओमुळे झालेले बदल बरेचसे सकारात्मक होते. कारण रेडिओ ऐकताना दररोजच्या गोष्टी नेहमीप्रमाणेच करता येतात. पण टि.व्ही. समोर ठाणमांडून बसावे लागत असल्याने ग्रामजीवनात झालेले परिणाम नित्याच्या दिनचर्येवर गंभीर परिणाम करणारे ठरले. क्रिकेट सारखा खेळ ग्रामीण भागात प्रचंड लोकप्रिय झाला व परंपरागत कब्बडी, खोको, लगोरी, विटी-दांडू हे खेळ लुप्त होऊ लागले. 1950 नंतरच्या काळात कसेल त्याची जमीन आणि कुळकायदा हे दोन नवीन कायदे आल्याने अनेक भूमीहीन शेतकऱ्यांना कधी नव्हे ते त्यांचे अधिकार मिळाले. या दोन कायद्याचे अनेक बरे-वाईट परिणाम ग्रामीण जीवनावर झाल्याचे दिसते. ग्रामीण भागासाठी अनेक जलसिंचन योजना सरकारने कार्यान्वित केल्या व त्यामुळे शेतीचा पारंपरिक ढाचा पूर्णपणे बदलून गेला. उसासारख्या नगदी पिकाला मोठा भाव आला व बहुसंख्य शेतकरी पारंपरिक पिके सोडून ऊस लागवडीकडे वळले. पण अन्नधान्याचा

तुटवडा होऊ नये म्हणून सरकारने भरपूर पिक देणाऱ्या हायब्रीड बियांणी शेतकऱ्यांना दिली परंतु या व्हरायटी बऱ्याच निसत्त्व असल्याने व पहिल्यांदा जास्त उत्पादन देणाऱ्या वाटल्या तरी रोगाला लगेच बळी पडणाऱ्या असल्याने, खर्च जास्त अन् उत्पादन कमी अशी अवस्था होऊन शेतकरी एका नवीन दुष्टचक्रात अडकला. म. फुल्यांच्या विचारातून निर्माण झालेली सत्यशोधकीय विचारधारा नंतरच्या काळात बरीच क्षीण झाली. नंतरच्या काळात मार्क्सवादी जाणीवेतून निर्माण झालेले शे.का.प. सारखी चळवळ काही भागात बऱ्याच काळापर्यंत प्रभावी राहिली परंतु नंतरच्या काळात ती ही क्षीण होत गेली. काँग्रेसने दीर्घकाळापर्यंत आपली एकहाती सत्ता महाराष्ट्रात चालवली परंतु नंतरच्या काळात काही आक्रमक व स्थानिक विषयांना प्राधान्य देणाऱ्या संघटना, पक्ष स्थापन झाले. धार्मिक अस्मिताही नंतरच्या काळात अधिक तीव्र झाल्याच्या दिसतात. या सर्व कालिक संदर्भात आपणाला ग्रामीण कादंबरीच्या लेखनात कालानुरूप जे बदल झाले त्याचा आढावा घेता येतो. म्हणूनच ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना कालिक संदर्भ तपासणे अगत्याचे ठरते.

**2.7 कालिक बदल आणि साठोत्तरी ग्रामीण कादंबरी**

1960 नंतरच्या काळातील काही कादंबऱ्यांचे संदर्भ घेऊन वर कालिक अभ्यासाची जी आवश्यकता व्यक्त केली आहे ती तपासून पाहता येईल. 'पाचोळा' ही पूर्णपणे ग्रामीण बोलीत लिहिलेली पहिली कादंबरी आहे. ग्रामीण माणसाला हळूहळू त्याच्या अस्तित्वाचे भान येऊ लागले होते याची ही खूण आहे. वाढते शहरीकरण आणि त्यामुळे संकुचित होणारी ग्रामसंस्कृती याचे दर्शन या कादंबरीत घडते. कृषी व्यवस्था विस्कटल्यामुळे कृषी आधारावर इतर उद्योग करणाऱ्यांची कशी धुळदाण झाली याचे चित्रणही यात येते. 'गोतावळा' ही आनंद यादव यांची अत्यंत महत्वाची अशी ग्रामीण कादंबरी आहे. कृषीमध्ये कालानुरूप येऊ लागलेले बदल, त्यामुळे शेती करण्याच्या पद्धतीत होऊ लागलेले बदल. एका बाजूला नवी व्यवस्था आकाराला येत होती तर दुसऱ्या बाजूला पारंपरिक व्यवस्था आणि त्या व्यवस्थेत गुरफटलेला माणूस तडीपार होत होता. या संक्रमणाच्या अवस्थेचे चित्रण या कादंबरीत आहे. एकूणच बदलत्या ग्रामीण मानसिकतेचा आढावा घेणारी ही कादंबरी आहे. आजपर्यंत शेती ही शेतकरी, त्याची जमीन त्यासाठी उपयुक्त असलेले पशू आणि निसर्ग यांच्या साहचर्यातून चालणारी एक जैविक व्यवस्था होती पण आता शेतीत यांत्रिकता आल्याने त्यातील अनुकंपा संपली आणि व्यवहार आला आणि व्यवहार आला की मानवी संबंध किती शुष्क होतात आणि यात प्राणी आणि निसर्ग हेच ज्याचे विश्व आहे त्याची काय दारूण अवस्था होते याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत झाले आहे . 1965 मध्ये प्रकाशित झालेली हमीद दलवाई यांची 'इंधन' ही देखील ग्रामीण परिसरात येऊ लागलेल्या नव्या बदलांची व यातूनच

बिघडत जाणाऱ्या मानवी संबंधाची मांडणी करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीला समकालीन राजकीय संदर्भ आहेत व स्वातंत्र्योत्तर काळात सर्वच क्षेत्रात राजकारण घुसल्याने लोकांची मानसिकता कशी बदलत गेली व धार्मिक अस्मिता कशा जागृत होऊन धार्मिक तेढ निर्माण होऊ आगली याचे चित्रण ही कादंबरी करताना दिसते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या बदलेल्या अस्मितांच्या राजकारणात समंजस माणूस हतबल होऊ लागला आहे ही कादंबरीतून व्यक्त होणारी जाणीव जास्त अस्वस्थ करणारी आहे. एकूणच पारंपरिक ग्रामीण कादंबरीपेक्षा पूर्णपणे वेगळे आशयद्रव्य घेऊन आलेली कादंबरी; म्हणून या कादंबरीची नोंद घेतली पाहिजे. नंतरच्या काळात हा प्रश्न अधिक तीव्र झाल्याचे दिसत असले तरी अशा संवेदनशील विषयावर लिहिण्याचे धाडस कोणी दाखवीत नाहीत हे त्यापेक्षा ही जास्त अस्वस्थ करणारे आहे. ना.धो. महानोर यांची 'गांधारी' ही पारतंत्र्यातील व स्वातंत्र्योत्तर काळातील बदललेल्या ग्रामपरिस्थितीचे चित्रण करणारी आणि म्हणूनच कालिकदृष्या महत्त्वाची असलेली अशी कादंबरी आहे. एका बाजूला निजामी राजवटीत लोकांना भोगावे लागणारे त्रास व बायकांना त्यांनी अब्रू सांभाळण्यासाठी करावी लागणारी साहसे यांची वर्णने आहेत तर स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामपातळीवर देखील भ्रष्टाचाराने कसे थैमान घातले आहे याचे वर्णन ही कादंबरी करते. आजच्या बदलणाऱ्या परिस्थितीत सत्प्रवृत्तीच्या माणसांचा कसा पराभव होतो याचे वास्तवदर्शी चित्रण महानोरांनी या कादंबरीतून घडविले आहे. परिवर्तनामुळे पारंपरिक श्रद्धास्थानांवर कसे आघात होत आहेत याचे चित्रण लक्ष्मीकांत तांबोळी यांनी 'दूर गेलेले घर' या कादंबरीतून केले आहे. पारंपरिक श्रद्धा आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांच्यातील संघर्ष या कादंबरीत आहे. बदललत्या काळातील एक महत्त्वाचा विषय मांडणारी आणि म्हणूनच कालिक अभ्यासात नोंद घेतलीच पाहिजे अशी ही कादंबरी आहे. महादेव मोरे यांच्या बऱ्याच कादंबऱ्या नेमकी परिणामकारकता साधण्यास अनेकदा असफल ठरत असल्या तरी ग्रामीण जीवनातील आजपर्यंत उपेक्षित असणाऱ्या घटकाना त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून बोलते केले हे मराठी ग्रामीण कादंबरीला त्यांनी दिलेले मोठे योगदान आहे. जोगतिणी सारख्या विषयावर त्यांनी कादंबरी लिहिली, आजपर्यंत उपेक्षित राहिलेल्या विडी कामगारांच्या समस्यांवर त्यांनी कादंबरी लिहिली. त्यामुळे ग्रामीण कादंबरीचे क्षेत्र काळानुसार अधिकाधिक कसे विस्तारू लागले आहे याची प्रचिती महादेव मोरे यांच्या कादंबऱ्या देतात. साधारणतः 1960 ते 1980 हा काळ मराठी ग्रामीण कादंबरीचा स्वरूपनिश्चितीचा आणि विस्ताराचा काळ असल्याचे दिसते. काही अपवाद वगळता 1960 अगोदरची ग्रामीण कादंबरी ही पांढरपेशा मध्यमवर्गीय लेखकांनीच लिहिली आहे त्यामुळे त्यात अनुभवाचा जीवंतपणा नाही परंतु फक्त अनुकंपेची भावना आहे. साठ नंतरच्या काळात ग्रामजीवन

ज्यानी प्रत्यक्ष अनुभवले तेच लिहू लागले आहेत त्यामुळेच काही कादंबऱ्या आत्मनिवेदनाचे तंत्र वापरून लिहिलेल्या आहेत. 1960 नंतर प्रत्यक्ष ग्रामीण भागातील जे लेखक लिहिते झाले त्यांच्याबद्दल डॉ. रत्नाकर मंचरकर यांनी नोंदविलेला अभिप्राय देखील महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, "यातील बव्हंश लेखक मूळचे खेड्यातले असले तरी आता शहरात घडलेले आहेत. त्यामुळे ते दुभंगल्यासारखे वाटतात. गावाकडची माणसं शहरी अलिप्तपणे किंवा ग्रामीण जिव्हाळ्याने उभी करणे त्यांना साधत नाही. त्यामुळे त्यांना माणसं दिसतात; पण ती गवसत नाहीत. अनुभूती ग्रामीण आणि आविष्कार नागर अभिरुचीला मानवणारा या द्वैतातूनही त्यांचे दुभंगले पण व्यक्त होते. हे विवेचन मुख्यतः साठ ते ऐंशी या कालखंडातील कादंबरीकारांना आणि त्यांच्या साहित्याला लागू पडते " [10] हे विधान कादंबरीचा कालिक अभ्यास करताना महत्त्वाचे ठरते. शहरी भागात वास्तव्यास गेल्यानंतर लेखकाची मानसिकता बदलते का? हा प्रश्न खूप महत्त्वाचा आहे. त्यांनी जे नोंदविले आहे ते काही लेखकांच्या बाबतीत खरे आहे परंतु काही लेखक शहरी भागात स्थलांतरीत झाल्यानंतरही अस्सल ग्रामीण अनुभूती देणारे लेखनच करीत असलेले दिसतात. उदा: आनंद यादव, त्यामुळे काही लेखकांच्या लेखनात जे दुभंगलेपण जाणवते त्याची कारणे फक्त शहरी भागातील त्यांचे वास्तव्य हे नसून इतरही काही असणे शक्य आहे. 1960 पर्यंतच्या कालखंडात मराठी कादंबरी एकाच दिशेने पुढे जात. होती असे जाणवते. पारंपरिक स्थितिशील अशा ग्रामीण जीवनाचे चित्रण त्यात दिसून येते. निसर्ग आणि माणूस यांच्यातील झुंज असे काहीसे तिचे स्वरूप असल्याचे दिसते. 'बनगरवाडी' हे याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. हे सर्वच लेखन एका स्थितिशील, नियतीच्या हातचे बाहुले होऊन राहिलेल्या समाजाचे वाटते त्यामुळे त्यातील काळही गोठल्यासारखा वाटतो. 1960 नंतर माणूस, माती आणि निसर्ग यांच्यातील सहसंबंधांचा शोध साठोत्तरी लेखक घेऊ लागले. व हळूहळू मातीपासून आणि निसर्गापासून आलेली तुटलेपणाची भावना या साठोत्तरी कादंबरीच्या केंद्रस्थानी आली याचे मुख्य कारण नव्याने आलेले यंत्रयूग आहे, याची जाणीव देखील ही कादंबरी देताना दिसते. यातील काही लेखन हे फक्त जे जुने आहे ते संपत आहे या खंतीतून झाले आहे तर काही मोजक्यानीच या मागची कारणमिमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. या संक्रमणामुळे जी नवीन व्यवस्था निर्माण होत आहे ती जुन्या व्यवस्थेलाच नव्हे तर पारंपरिक ग्रामीण मूल्यांवरही आघात करीत आहे ही भावना अनेक कादंबऱ्यांतून तीव्रतेने व्यक्त झाली आहे. या लेखनामुळे ग्रामीण कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरीतील सौंदर्यवाद निपटून काढून तिला वास्तववादी बनविले. 1960 नंतर लिहिल्या गेलेल्या ग्रामीण कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती अधिकाधिक वास्तववादी होऊ लागली.

### 2.7.1 1980 ते 1990 या कालखंडातील ग्रामीण कादंबरी

1980 पर्यंत मराठी ग्रामीण कादंबरी चांगली स्थिरस्थावर झालेली दिसते. ग्रामीण साहित्याची जी चळवळ सुरू झाली त्या चळवळीने या ग्रामीण कादंबरी लेखनाला एक नवीन बळ दिले पण या संदर्भात अविनाश सप्रे यांनी नोंदविलेला अभिप्राय देखील लक्षात घेतला पाहिजे. ते म्हणतात, "'गोतवळा' नंतर नव्या टप्प्यावर नेईल अशी ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी निर्माण झालेली नाही. ग्रामीण भागातून आलेले लेखक काही बऱ्या- वाईट कादंबऱ्या लिहीत आहेत हे खरे असले तरी 80 ते 90 या दशकात हा प्रवाह आता क्षीण होतच चालला आहे असे म्हणता येईल. श्री आनंद यादव यांनी मध्यंतरी ग्रामीण साहित्याची चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना त्यात यश आलेच असे म्हणता येत नाही……. दलितेतर ग्रामीण लेखकानां या दशकाचे आव्हान पेलवले आहे असे दिसत नाही. या काळातले ग्रामीण जीवन अत्यंत प्रवाही झाले, राजकारण समाजकारण आणि अर्थकारण यांना नव्या दिशा लाभल्या आणि त्यातून गुंतागुंत निर्माण झाली. ग्रामीण जीवन आरपार ढवळून निघाले. नव्या जीवनरीती निर्माण झाल्या, नवी आव्हाने निर्माण झाली. ग्रामीण जीवनाचे हे नवे दर्शन घडवणारा कादंबरीकार या काळात पुढे आलाय असे दिसत नाही." [11] मराठी ग्रामीण कादंबरीचा कालिकदृष्या विचार करीत असताना हे मत निश्चितच विचारात घ्यावे लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जी ग्रामीण साहित्याची चळवळ आनंद यादव यांनी सुरू केली होती ती म्हणावी तशी यशस्वी झाली नाही असे त्यांनी स्पष्टपणे नोंदविले आहे. हे मत अगदी संपूर्णपणे मान्य करता येण्यासारखे नाही. कारण या चळवळीमुळे अनेक नवोदित लेखकांना लेखनाची निश्चितच दिशा मिळाली आहे. तसेच, ग्रामीण साहित्याची एक सैद्धांतिक चौकट निर्माण करण्याचा किमान प्रयत्न या चळवळीने केला हे नाकारता येणार नाही. अर्थात, मराठी ग्रामीण कादंबरीला पुढील टप्प्यावर घेऊन जाईल अशी कादंबरी या काळात निर्माण झाली नाही हे त्यांचे मत निश्चितच विचारात घ्यावे लागेल. पुरूषोत्तम बोरकर यांची ' मेड इन इंडिया, अशोक व्हटकर यांची 'मेलेले पाणी', राजन गवस यांची 'भंडारभोग', अशा काही नोंद घेण्यासारख्या कादंबऱ्या या काळात लिहिलेल्या गेल्या पण 'गोतावळा' एवढी लोकप्रियता यापैकी कोणत्याही कादंबरीला मिळू शकली नाही हे ही तेवढेच खरे आहे. या काळात मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह क्षीण झाला हे त्यांचे मत काही प्रमाणात मान्य करावे लागते. त्यांनी या काळात झालेल्या ज्या बदलांची चर्चा केली आहे व त्या बदलाना पेलणारा लेखक या काळात निर्माण झाला नाही असे जे म्हटले आहे ते मात्र तेवढेसे बरोबर नाही. आत्ता बदल होऊ लागले आणि आत्ता त्यावर लेखन झाले असे सहसा होत नाही. हे जे बदल झाले आणि 1990 नंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांचे पर्व सुरू झाले व त्याचे जे परिणाम ग्रामीण भागावर

झाले त्याचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या नव्वदोत्तर काळात मोठ्याप्रमाणात लिहिल्या गेल्याचे दिसते आणि म्हणूनच नव्वदोत्तर काळात मराठी कादंबरी लेखनातील सगळ्यात सशक्त प्रवाह म्हणून 'ग्रामीण कादंबरी' पुढे येत असल्याचे दिसते. विश्वास पाटील, राजन गवस, कृष्णात खोत, सदानंद देशमुख, रवींद्र शोभणे असे समर्थ ग्रामीण कादंबरीकार या काळात पुढे आले आहेत त्यामुळे अविनाश सप्रेंच्या अभिप्रायाकडे एक तात्कालिक अवस्था म्हणून आपणाला पहाता येते व नंतरच्या काळात जे बदल जागतिक पातळीवर झाले व त्याचा जो प्रभाव ग्रामीण जीवनावर पडला त्यातून क्षीण होऊ पाहणारा हा कादंबरीचा प्रकार किती जोमाने पुन्हा वर आला हे देखील आपणाला पाहता येते. कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण होणोरे वाङ्मय याची एक निश्चित संगती देखील आपणाला या सर्वातून लावून दाखवता येते व त्यातून वाङ्मयीन कालखंडांचा अभ्यास किती महत्वाचा असतो हे देखील अधोरेखित होते.

**2.7.2 नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी**

1990 नंतरचा काळ मराठी ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाचा स्वीकार केला. किंबहुना भारताला तो करावाच लागला या नव्याने स्वीकारलेल्या अर्थव्यवस्थेचा  खूप मोठा परिणाम ग्रामीण भागावर झाला. दुसऱ्या बाजूला संगणक क्रांती झाली आणि त्यामुळे कल्पनातीत अशी परिवर्तने आली. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेली प्रगती तोंडात बोटे घालायला लावणारी होती. परंतु या नवीन व्यवस्थेतून पारंपरिक ग्रामीण व्यवस्थेच्या विघटनाला आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली. वर्षानुवर्षे चालत आलेल्या ग्रामव्यवस्था कोलमडून पडल्या. शिक्षणांचे सार्वत्रिकीकरण झाले पण त्याचा परिणाम म्हणून सुशिक्षित बेकारांचे लोंढे याच काळात निर्माण झाले. नोकरी मिळत नसल्याने मोठे नैराश्य तरूणांच्या मनात निर्माण झाले. जातीअंताच्या गोष्टी केल्या जात असताना जातीच्याअस्मिता या काळात अधिक तीव्र झाल्या. सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचाराने आपले उत्तुंग शिखर गाठले. शिक्षण क्षेत्रालाही या भ्रष्टाचाराने पूर्णपणे पोखरून काढले. खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ बसत नसल्याने शेती हा आतबट्ट्याचा  व्यवसाय झाला. शेतकऱ्यांवरील कर्जाचे डोंगर वाढत गेले व शेतकऱ्यांच्या आत्महत्या खूप मोठ्याप्रमाणात वाढल्या. शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकण्याची पाळी आली आणि त्याच जमिनीवर रोजंदारीवर काम करण्याची वेळ आली. विकासाची सूज सर्वत्र दिसू लागली परंतु आतून सगळ्याच व्यवस्था पोखरून निघाल्या. संस्कृतीचे सपाटीकरण झाले. आपली मूल्यव्यवस्था कोलमडून पडली. भाषिक आक्रमक हा या काळात झालेला आणखी एक महत्त्वाचा बदल. इंग्रजीला  ज्ञानभाषा म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. इंग्रजीतून शिकणे, बोलणे हे प्रतिष्ठेचे झाले व

आपल्या भाषांबद्दलचा न्यूनगंड निर्माण झाला. याचा मोठा फटका ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसला. जी कल्पनातीत अशी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, परिवर्तने या कळात घडून आली त्याचा परिणाम या काळात जे कादंबरी लेखन झाले त्यावर निश्चितच झाला आहे. नव्वदोत्तर कादंबरी संबंधात आपली निरीक्षणे नोंदविताना डॉ. शंकर विभुते यांनी याच सर्व गोष्टी मांडल्या आहेत ते म्हणतात, "नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी शेती, माती व नाती पुरती मर्यादीत राहिली नसून त्याचा संबंध जागतिकीकरणाशी आलेला आहे. त्यामुळे आधुनिक बि-बियाणे, महागडी -किटकनाशकं औषधं व शहरात वर्षभर मिळणारा भाजी-पाला, खेड्यातही दुध पाकीटाचा वापर, कर्ज माफीसाठी शासनाने केलेले नियम, सुशिक्षित बेकारांची शेतकऱ्यांची पोरं, शेती विषयी त्यांची असलेली अनास्था, शेतातून पिकणारे पीक व बदलेले जीवनमान संतुलित ठेवण्यासाठी होणारा खर्च याचा नसलेला ताळमेळ, वाढती महागाई, या सर्व बाबीमुळे मनात आलेली निराशा त्यातून आत्महत्यांकडे वळणारी त्यांची पाऊले ही बदलत्या ग्रामीण कादंबरीची आशयसूत्रे आहेत." [12] जागतिकीकरणामुळे जी परिवर्तने आली त्याचा ग्रामीण भागावर झालेला परिणाम दृश्य तर होताच पण एकूणच व्यवस्था परिवर्तन घडवून आणणारा होता. ही परिवर्तने विविध अंगांनी झाल्याचे दिसते. पारंपरिक बलुतेदारी पद्धती अगोदरच मोडकळीस आली होती परंतु आता शेती करण्याची पारंपरिक पद्धती देखील बदलली. तंत्रज्ञानाने शेतीमध्ये अनेक सुधारणा आणल्या पण खर्च देखील वाढला. नवीन हायब्रीड बियाणे आली, उत्पादन वाढले पण उत्पादनाचा खर्च देखील वाढला. ऊस, कापूस यासारखी नगदी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला त्यामुळे मिश्र पिके घेऊन शेतीचा म्हणजेच आपल्या आर्थिक परिस्थितीचा समतोल साधण्याचे जे कौशल्य एवढी वर्षे शेतकऱ्याने हस्तगत केले होते ते बिघडले. एका अर्थाने जागतिकीकरणांतून पैशाला मिळालेले महत्त्व व जास्त पैशांची निर्माण झालेली हाव याच्या जाळयात शेतकरी त्याच्या ही नकळत अगदी सहज ओढला गेला. आपल्या राजकरण्यांची नियोजनशुन्यता त्याला तेवढीच कारणीभूत ठरली. सहकारी साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले परंतु या सहकार क्षेत्राला भ्रष्टाचाराने पोखरल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था आणखी हलाखीची झाली. ऊसासारख्या पिकाला पाणी वारेमाप लागते. त्यामुळे भूजलातील पाण्याचा अनियंत्रित उसपा केला गेला व त्याचा परिणाम म्हणजे अनेक भागात प्रचंड पाणी टंचाई निर्माण झाली. अशा सर्व विषयांना आपल्यामध्ये सामावून घेत नव्वदोत्तर कादंबरी लिहिली गेली आहे त्यामुळे नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप तपासणे तेवढेच महत्त्वाचे आहे. राजकारणाचा गावात झालेल्या शिरकावामुळे गावातील वातावरण कसे बिघडून जाते, माणसाला माणसे कशी विसरतात. एकमेकांच्या उरावर कशी बसतात याचे चित्रण

हळूहळू 1975 नंतरच ग्रामीण साहित्यातून येऊ लागले होते परंतु त्याचे अत्यंत भेसूर रूप आपणाला 1990 नंतरच्या कादंबऱ्यांमधून दिसून येते. रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही कादंबरी राजकारणाच्या मूल्यऱ्हासाचा पटच आपल्यासमोर मांडते. अर्थात हिला पूर्णपणे ग्रामीण कादंबरी म्हणता येत नसले तरी गावपातळीवरील राजकारण ते राष्ट्रीय पातळीवरील राजकारण या सर्वाचा पट यातून उलगडत गेला आहे त्यामुळे ग्रामीण पातळीवर या राजकारणाने कोणते गंभीर परिणाम केले आहेत हे समजून घेण्यासाठी ही कादंबरी खूपच उपयुक्त आहे. राजकारणामुळे गावातील जाती-पातीत कशी फूट पडते. जातीय अस्मिता कशा जागवल्या जातात आणि या सर्वात सामान्य माणूस कसा होरपळून जातो त्याचे जगणे कसे मुश्किल होऊन जाते याचे प्रत्ययकारी चित्रण राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीतून होते. अर्थात, या कादंबरीत राजकारण तर आहेच परंतु सामाजिक प्रश्नांवरील चिंतन व्यक्त करणारी म्हणून देखील ही कादंबरी तेवढीच महत्त्वाची आहे. मोहन पाटील यांची 'लिंगाड आणि खांदेपालट' ही कादंबरी देखील राजकीय हस्तक्षेपामुळे ग्रामीण जीवन कसे होरपळून जाते याचे चित्रण या कादंबरीत येते. बाबाराव मुसळे यांची 'पाटीलकी' ही कादंबरी देखील सरपंचपदे राखीव झाल्यानंतर गावात ज्या प्रकारचे राजकारण सुरू झाले त्याचे चित्रण करणारी कादंबरी आहे. गणेश आवटे यांनी आपल्या 'भिरूड' या कादंबरीतून गावांमधील जातीजातींचे राजकारण व एकूणच समाजाचा होणारा मूल्यऱ्हास याचे मार्मिक चित्रण या कादंबरीतून केले आहे. इतरही अनेक कादंबऱ्यांमधून राजकारणामुळे ग्रामीण जीवन कसे उद्ध्वस्त होऊ लागले आहे याचे चित्रण झाल्याचे दिसते. गलिच्छ राजकारण आणि त्याचा ग्रामजीवनावर होणारा परिणाम हा विषय केंद्रस्थानी ठेवून अनेक कादंबऱ्यांचे लेखन नव्वदोत्तर काळात झाल्याचे दिसते. कालानुरूप राजकारण अधिकाधिक भ्रष्ट होत गेल्याने नव्वदोत्तर काळात त्याचे चटके ग्रामीण माणसाला जास्त तीव्रतेने बसू लागले आणि म्हणूनच नव्वदोत्तर काळात या विषयावरील कादंबरी लेखन मोठ्याप्रमाणात झाल्याचे दिसते. नव्वदोत्तर काळात कृषीचे अर्थकारण बदलल्याने कोणते बदल ग्रामीण क्षेत्रात झाले आणि त्याचे कोणते गंभीर परिणाम या क्षेत्रावर झाले याचा आढावा अनेक कादंबरीकारांनी घेतला आहे. जागतिकीकरणाचा परिणाम शेतीवर कसा होत आहे याचे विश्लेषण सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' या कादंबरीतून केले आहे. आज शेतकऱ्यावर आत्महत्येची पाळी येत आहे पण या सर्वामागे जागतिकीकरण कसे आहे याचे सुंदर विश्लेषण त्यांनी केले आहे. शंकर सखाराम यांनी आपल्या 'एस .ई. झेड.' या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या पिकाऊ जमिनी कवडीमोलाने घेऊन त्या ठिकाणी "खास आर्थिक क्षेत्र' (S.E.Z) स्थापून त्या जमिनी बड्या बड्या उद्योजकंना देण्याचा घाट जो सरकरने घातला होता त्या विरोधात जे लोक आंदोलन झाले त्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

एकूणच या येणाऱ्या  उद्योगांमुळे व त्यांच्या पाठीशी असणारे राजकारण्यांचे बळ आणि भ्रष्ट नोकरशाही यामुळे येथील शेतकरी कसा उखडून फेकला जात आहे. या सर्वाचे चित्रण या अशाप्रकारच्या कादंबऱ्यांमधून होताना दिसते. शेती उत्पादनाला मिळणारा अत्यल्प भाव व त्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारा कर्जबाजारीपणा आणि त्यामधून वाढणाऱ्या आत्महत्या किंवा शेती विकण्याची येणारी वेळ या सर्वाचे चित्रण अनेक कादंबऱ्यांमधून आले आहे. केळीचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची भाव पडल्यामुळे काय अवस्था होते याचे चित्रण अशोक कोळी यांच्या 'पाडा' या कादंबरीतून झाले आहे. तर उसाला भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या होणाऱ्या दारूण अवस्थेचे चित्रण मोहन पाटील यांच्या 'साखरफेरा' या कादंबरीतून झाले आहे. शेती पिकतच नसल्याने व मालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आपल्या दररोजच्या गरजा भागविण्यासाठी आपल्या जमिनी विकण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही याचे चित्रण सुरेंद्र पाटील यांच्या 'चिखलवाटा' या कादंबरीतून झाले आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळाली पाहिजे म्हणून जी शेतकरी चळवळ उभी राहिली त्या चळवळीतील प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या वाटेला किती कष्टाचं जीवन आलं याची मांडणी देखील ही कादंबरी करताना दिसते. भीमराव वाघचौरेंच्या 'गराडा' या कादंबरीतून देखील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची आणि शोषणाची चर्चा आली आहे.  कैलास दोंड यांच्या 'कापूसकाळ' मध्ये देखील कापसाच्या हमीभावापासून शेतकऱ्यांची सर्वांकडून आर्थिक पिळवणूक कशी केली जाते याचे चित्रण आले आहे. दिनकर चौधरी यांच्या 'बुझ्वागमन' मधूनही शेतकऱ्याचे आर्थिक प्रश्न, त्याचे होणारे आर्थिक शोषण, सरकारचे शेतीसंबंधी असलेले व्यवहारशून्य नियोजन या सर्वाची अत्यंत सखोलतेने चर्चा केली आहे. नव्वदोत्तर कादंबरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही कादंबरी आत्मपरीक्षण देखील करू लागली आहे. म्हणूनच शेतकऱ्यांच्या हालाखीच्या स्थितीस शेतकरी स्वतः देखील कसे कारणीभूत आहेत याचे चित्रण अनेक कादंबऱ्यांमधून होताना दिसते. विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' मधून पाण्याच्या अनियंत्रित वापरास शेतकरीच कसे कारणीभूत आहेत हे अधोरेखित झाले आहे. भारत काळे यांनी ' 'ऐसे कुणबी भूपाळ'' मधून भावाभावातील भांडणे, जमिनीच्या वाटण्या, एकमेकांचे पाय ओढण्यात धन्यता मानणे, अनैतिक गोष्टींची चटक आणि घराकडे दुर्लक्ष असे अनेक विषय या कादंबरीच्या माध्यमातून हाताळले आहेत. सतीश जाधव यांनी आपल्या 'बळ' या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या अंगी असलेले अनेक दोष अधोरेखित केले आहेत. शेषराव मोहिते यांनी 'असं जगणं तोलाचं' आणि 'धुळपेरणी' या कादंबऱ्यांमधून हेच वास्तव सांगितले आहे.  शेतकऱ्यांच्या ज्या विविध समस्या आहेत त्यांना केंद्रस्थानी ठेवून नव्वदोत्तर काळात अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्या

म्हणजे 'पाणी' या विषयावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्याचे दिसते. कारण या काळात या समस्येने अकराळ-विकराळ रूप धारण केले. विश्वास पाटील यांच्या ‘पांगिरा’ मधून हा प्रश्न आलाच आहे पण त्याच बरोबर हाच प्रश्न केंद्रस्थानी ठेवून सदानंद देशमुख यांनी 'पाणी' ही कादंबरी लिहिली आहे. अरूण साधू यांच्या 'शापित' या कादंबरीतून देखील हाच विषय हाताळण्यात आला आहे. बाबाराव मुसळे यांची 'पखाल' रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी' अशा अनेक कादंबऱ्यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल . समस्याप्रधान कादंबऱ्यांमध्ये शंकर सखाराम यांची ‘एसईझेड’ विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' या दोन कदंबऱ्यांचा उल्लेख करावाच लागतो. धरणग्रस्तांच्या फरफटीचे चित्रण विश्वास पाटील यांनी झाडाझडती मधून परिणामकारक रीतीने केले आहे. मोहन पाटील यांच्या 'बस्तान' मधून आधुनिकीकरणामुळे शेत जमिनीवर जे अतिक्रमण होत आहे त्या विषयाला वाचा फोडली आहे. सीताराम सावंत यांनी 'भुई भुई ठाव दे' या कादंबरीतून शेत जमिनींचे बिगर शेत जमिनीत रुपांतर करून या जमिनी बिल्डरांच्या घशात कशा घातल्या जातात याचे मर्मग्राही चित्रण केले आहे. ऊसासारखी नगदी पिके मोठ्याप्रमाणात घेतली जाऊ लागली आणि यामधून उस तोडणी कामगार निर्माण झाले. ज्यांना रोजगाराचा मोठा प्रश्न होता. त्यांनी ऊस तोडणीचे काम स्वीकारले व ऊस उत्पादकांना हे स्वस्त मजूर ऊस तोडणीसाठी उपलब्ध झाले. पण यातूनच या मजूरांची परवड देखील सुरू झाली. मुकादमांकडून यांचे शोषण सुरू झाले. म्हणजे नवीन व्यवस्थे बरोबर नवीन समस्या देखील निर्माण झाल्या. बा. ग. केसरकर यांची 'कुणाच्या खांद्यावर', सरदार जाधव यांची 'कोयता', योगिराज वाघमारे यांची 'धुराळा' रसुल सोलापुरे याची ‘फाटलेलं आभाळ’, शांता जोशी यांची 'गव्हानी' अशा काही कादंबऱ्या ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांच्या जीवनावरच आधारित आहेत. म्हणजे काळानुसार बदलणारी परिस्थिती आणि त्यातून उभ्या राहणाऱ्या नवीन व्यवस्था. त्यामधून निर्माण होणाऱ्या नवीन समस्या व त्याचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या म्हणजे; विशिष्ट कालखंड, त्या कारखंडात निर्माण झालेले प्रश्न व त्याचे कादंबरी वाङ्मयात पडलेले प्रतिबिंब असा संबंध आपणाला यातून सहजतेने दाखवता येतो. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि शेतकरी वर्गावर त्याचा होणारा परिणाम याचे चित्रण वासुदेव मुलाटे यांच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' किंवा सुरेंद्र पाटील यांची ‘साखरफेरा’ या कादंबरीतून झाले आहे. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काही स्त्रियांनी या काळात ग्रामीण स्वरूपाच्या कादंबऱ्यांचे लेखन केले. विभावरी शिरूरकर या सारखा एखादा अपवाद वगळता आजपर्यंत स्त्रियांनी ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखन केल्याचे दिसत नाही. परंतु नव्वदोत्तर काळात ग्रामीण कादंबरी लेखिका म्हणून काही नावे निश्चितच पुढे आली आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे प्रतिमा इंगोले. त्यांनी 'बुढाई, 'पार्टटाईम' व ‘बोडखी’ या कादंबऱ्या लिहून

ग्रामीण कष्टकरी स्त्रिच्या वेदनांना आपल्या कादंबरीतून बोलके केले आहे. मथू सावंत यांनी देखील 'राहू-केतू' व ‘जिनगानी’ या कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरी लेखनात महत्त्वाची भर घातली आहे. दुष्काळाचा प्रश्न नव्वदोत्तर काळातील अनेक लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडला आहे. त्यामध्ये किशोर सानप यांची 'भूवैकुंठ' रवींद्र शोभणे यांची 'पांढर' या महत्त्वाच्या आहेत. दव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरीत आणखी एक विषय प्रखरतेने पुढे आला आहे आणि तो म्हणजे सुशिक्षित बेकारांचा प्रश्न व शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार. या संदर्भात महेंद्र कदम यांच्या 'धूळपावलं' व 'आगळ' या दोन्ही कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. सीताराम सावंत यांच्या 'नामदार', 'देशोधडी' या कादंबऱ्यांमधूनही या विषयाला वाचा फोडण्यात आली आहे. 1990 नंथरच्या एकूण कादंबरी लेखनाचा विचार करता या काळात जे कादंबरी लेखन झाले त्याला कालिक संदर्भ निश्चितपणे आहेत. 1990 नंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आणि त्याचे दृश्य परिणाम शेती आणि शेतीवर आधारित जे उद्योगधंदे होते त्याच्यावर होऊ लागला हे स्पष्टपणे दिसते. आजपर्यंत शेतकरी हा शेतीनिष्ठ तर होताच पण तो समुहनिष्ठ देखील होता पण या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने त्याची सहुहनिष्ठता नष्ट केली. तो अधिक व्यक्तिवादी झाला हे देखील आपणाला दिसते. नव्वदोत्तर काळात राजकारणाला अतोनात महत्त्व मिळाले त्यांने सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात प्रवेश केला व त्यामुळे सगळ्या व्यवस्था राजकारण केंद्रीत झाल्या व हे राजकारण स्वार्थी, आपमतलबी, भ्रष्ट व विवेकशून्य लोकांच्या हाती गेल्याने सामान्य माणसाचे जगणे या राजकारणाने मुश्किल करून टाकले. या सर्वाचे दर्शन आपणाला या नव्वदोत्तर कादंबरीत दिसते. याच काळात ग्रामीण भागातील सुशिक्षित शिक्षित लोकांची नवी पिढी तयार झाली. आपले शिक्षण कृषी व्यवस्थेला अनुकूल नसल्याने ते सुशिक्षित तरूणाच्या मनात शेतीबद्दल अनास्था निर्माण करते आणि तो नोकरीसाठी धडपडतो. नोकरी मिळत नाही आणि शेती कराविशी वाटत नाही अशा कैचीत तो सापडतो व त्याचे जीवन उद्ध्वस्त होते. अगोदचा तरूण अशिक्षित होता ते एकार्थाने चांगले होते असे म्हणावे लागेल असे भयाण वास्तव या काळाने उभे केले आहे व याची जाणीव आपणाला या कादंबऱ्या करून देतात. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले परंतु त्यातूनच विनाअनुदानित शिक्षणसंस्थांचे पेव फुटले व अशा संस्थांमधील विद्यालयातून या नवशिक्षित नोकरीच्या अपेक्षेत असलेल्या ग्रामीण भागातील शिक्षित युवकांना अक्षरशः वेठबिगाराप्रमाणे वागविण्यात आले. काळाप्रमाणे निर्माण झालेल्या नवीन व्यवस्था आणि त्या व्यवस्थेमधून शोषणाचे निर्माण झालेले नवीन मार्ग हे भिषण वास्तव सर्वांनाच अस्वस्थ करणारे आहे. जात हा विषय ग्रामीण कादंबरीच्या कायमच केंद्रस्थानी राहिला आहे. जातीजातीतील संघर्ष हे देखील नवीन नाही परंतु

नव्वदोत्तर कळात जातीच्या अस्मितांचे राजकरण वाढीस लागले. अगोदरच्या काळी जातीभेद असले तरी माणूस म्हणून किमान काही विचार होत असे. बलुतेदारी पद्धतीतून किमान काही अधिकार दलित व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीना होते परंतु नवीन व्यवस्थेने जातीभेदच नव्हे तर मनभेदही करण्याचे काम केले. या काळात जातीभेद कमी होण्याऐवजी ते अधिक टोकदार झाल्याचे दिसते. जुन्या व्यवस्था नामशेष झाल्या परंतु जातीय अस्मिता मात्र वाढतच गेल्या असे दुर्दैवी चित्र नव्वदोत्तर काळात लिहिलेल्या गेलेल्या कादंबरीतून प्रखरतेने प्रत्ययास येते. या सर्वाचा अभ्यास केल्यानंतर लेखनाला असलेले कालिक संदर्भ किती महत्त्वाचे असतात हे यातून अधोरेखित होते. कोणत्याही काळातील वांङ्मय त्यातील बदल समजून घ्यायचे असतील तर आपणाला वांङ्मयाचा कालिक अभ्यास करणे आवश्यक ठरते या कालिक अभ्यासातून आपण वाङ्मयाचे विश्लेषण अधिक नेमकेपणाने करू शकतो म्हणून वाङ्मयाचा कालिक अभ्यास अत्यावश्यक ठरतो.

**2.8 समारोप:**

विशिष्ट  कालखंड आणि त्या कारखंडात निर्माण होणारे साहित्य याचा एक विशिष्ट सहसंबंध असतो. विशिष्ट कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण झालेले साहित्य याचा अभ्यास करताना या दोहोंचा परस्पर संबंध तपासणे आवश्यक असते. या अभ्यासातून बदलणाऱ्या काळाचा तत्कालीन साहित्यावर काय प्रभाव पडतो किंवा साहित्याचा एखाद्या कालखंडावर काय परिणाम होतो याचा आपणाला अभ्यास करता येतो. अभ्यासासाठीचा विषय, 'नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास: निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात' असा असल्याने या ठिकाणी काळाचा कादंबरी लेखनावर काय परिणाम झाला याचाच फक्त आढावा घेतला आहे. असा अभ्यास केल्याने एखाद्या काळात ज्या प्रकारचे साहित्य निर्माण होते त्याची पार्श्वभूमी काय होती याची जाणीव देखील आपणाला होते. कालखंड कसे मानावेत याबद्दल मतभेद असले तरी वाङ्मयाच्या संदर्भात विचार करता ज्या ठिकाणी वाङ्मयामध्ये ठळक अशी परिवर्तने जाणवतात त्या ठिकाणापासून काळ मानणे जास्त सयुक्तिक असते. प्रत्येक वाङ्मय प्रकाराचा कालखंडात वेगवेगळा असू शकतो कारण प्रत्येक वाङ्मयप्रकाराचे स्वरूप वेगवेगळे असते. ग्रामीण मराठी कादंबरीच्या संदर्भात विचार करताना 'नव्वदोत्तर'  हा वेगळा कालखंड निश्चितच मानावा लागतो. या काळात मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप पूर्णपणे बदलल्याचे दिसते. 1990 नंतर भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या प्रक्रियेने देखील जोर पकडला या सर्वामुळे शहरे तर बदलीच पण ग्रामव्यवस्थेवर देखील त्याचे गंभीर परिणाम झाले. कृषिकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाने मूलगामी स्वरूपाचे परिणाम केले आहेत. पारंपरिक शेती जवळ जवळ

उद्ध्वस्तच झाली. पैशाला अतोनात महत्त्व प्राप्त झाले त्यामुळे शेतकऱ्यांची मानसिकता ही बदललेली या बदललेल्या मानसिकतेचे दर्शनही आपणाला या काळातील साहित्यातून घडते. कालिक दृष्टिकोनातून ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना काही गोष्टी लक्षात येतात. प्रारंभीच्या काळात ग्रामीण कादंबऱ्यांची संख्या नगण्य म्हणावी अशी होती. 1857 ते 1920 या साठ वर्षांच्या कालखंडात फक्त दोन ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखन झाले. या काळात पडलेले तीन भीषण दुष्काळ, ग्रामीण भागांत शिक्षकाचा अभाव, लेखनाची कोणतीही परंपरा नसणे, शहरी माणसाचा गावाकडे पाहण्याचा तुच्छतापूर्वक दृष्टिकोन, अशी अनेक कारणे या मागे आहेत. म. फुल्यांनी शेतकऱ्यांचे दुःख मांडले, त्यांनी त्यांना संघर्ष करण्यास सांगितले, त्यांनी धर्माची चिकित्सा करून बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला, सत्यशोधक समाज स्थापन करून नवपरंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु असे असुनही फुल्यांचे चिकित्सक, परिवर्तनवादी विचार पारंपरिक ग्रामसंस्कृतीचा प्रचंड प्रभाव असलेल्या शेतकऱ्यांना स्वीकारणे तसे कठीण गेले व तसेच हे विचार अधिक ताकदीने पुढे नेणारा म. फुल्यांच्या तोडीचा नेता नंतरच्या काळात निर्माण झाला नाही हे देखील प्रारंभीच्या काळात ग्रामीण कादंबरी अत्यल्प लिहिण्यामागचे एक कारण आहे . एकूणच शेतकरी, कष्टकरी समाज स्वतःची पिळवणूक, शोषण, स्वतःचे हक्क याबद्दल जागृत नसल्याने व अज्ञान, अंधश्रद्धा, याच्यांत गुरफटलेला असल्याने मोठ्याप्रमाणात दैववादी असल्याने साहित्य निर्मिती करणे, त्यातून आपली परिस्थिती मांडणे, आपले दुःख जगासमोर मांडणे, या सर्वाबद्दल उदासीन असल्याने दिसते. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून या काळात ग्रामीण कादंबरी अत्यल्प प्रमाणात लिहिली गेली. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा प्रभाव 1920 नंतरच्या कलखंडावर दिसतो. ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीवरही तो दिसून येतो. महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या घोषणेतून अनेक मध्यमवर्गीय, शहरी लेखकांचे लक्ष ग्रामीण भागाकडे वळले. ग्रामसुधाराच्या प्रामाणिक भावनेतून त्यांनी साहित्य निर्मिती केली परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थितीची काहीच कल्पना नसल्याने, त्यांच्या निर्मितीमागे भाबडा आशावाद, आदर्शवाद जास्त होता त्यामुळे ग्रामीण वास्तवापासून या कादंबऱ्या शेकडो मैल दूर होत्या. या सर्वच कादंबऱ्यातून झालेले ग्रामदर्शन हे स्वप्नाळू, कृतक आणि फक्त मनोरंजन स्वरूपाचेच होते. मार्क्सवादाने मात्र ग्रामीण शेतकरी, कष्टकरी, महिला यांच्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन दिला. मार्क्सवादी विचारांमुळे ग्रामीण साहित्य लेखनातही काही सकारात्मक परिवर्तने आली परंतु या विचारातून ग्रामीण मराठी साहित्य लेखनाची मोठी परंपरा मात्र निर्माण झाली असे दिसून येत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामविकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या. पचांयत राज्य संकल्पना अमलात आणली गेली. पंचायतीना जादा अधिकार देण्यात आले. पंचवार्षिक योजना सुरू

करण्यात आल्या. कसेल त्याची जमीन, कुळ कायदा यांच्या माध्यमातून भू-सुधाराचे अनेक कायदे अस्तित्वात आले. अनेक नवीन जलसिंचन प्रकल्प सुरू झाले. सहकार तत्त्वावर अनेक संस्था, कारखाने सुरू झाले या सर्व बदलांचे जे काही बरेवाईट परिणाम झाले त्याचे चित्र आपणाला या काळात जे वाङ्मय निर्माण झाले त्यातून स्पष्टपणे पडल्याचे दिसते. शिक्षणाचा झालेला प्रसार, ग्रामीण माणसाचे जागृत झालेले आत्मभान, दलितांच्या चळवळी, या सर्वांच्या परिणामातून 1960 नंतर ग्रामीण साहित्याची निर्मिती मराठीत मोठ्याप्रमाणात होऊ लागली. मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करता. 1960 ते 1980 हा कालखंड मराठी ग्रामीण कादंबरीच्या विस्ताराचा आणि स्वरूप निश्चितीचा कालखंड होता असे म्हणता येते. 1980 नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीत काही एक थिजलेपणा आल्याचे जाणवतो. 1977 नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली व या चळवळीने ग्रामीण साहित्य निर्मितीला नवीन पाठबळ प्रदान केले. वेगवेगळ्या समाज स्तरातून आलेले लेखक हळूहळू लिहू लागले व त्याचा दृश्य परिणाम आपणाला नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीच्या लेखनात दिसू लागला. १९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने क्रांतिकारी परिवर्तने घडविली. याच काळात झालेली संगणक क्रांती, फोन, मोबाईल यांचे ग्रामीण भागात झालेले आगमन या सर्वांनी संपूर्ण ग्रामीण जीवन बदलून गेले. नवीन आलेली हायब्रीड बियाणी, किटकनाशके, नगदी पिकांच्या मागे लागून शेतीचा बिघडलेला समतोल, पाण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, ओल्या आणि सुक्या दुष्काळाने शेतकऱ्यांचे मोडलेले कंबरडे, शेतीतील उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ न बसणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला भाव न मिळणे, यातून वाढलेला कर्जबाजारीपणा व यातूनच शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या. शेतकऱ्यांची सुशिक्षित पिढी तयार झाली पण त्यांना नोंकऱ्या नाहीत, आणि सर्वत्र पसरलेल्या भ्रष्टाचारामुळे नोकऱ्या विकत घेण्याची ऐपत नाही अशी कठीण परिस्थिती निर्माण झाली. शिकलेल्या मुलांना शेतीतील कामे कमी दर्जाची वाटणे, नोकरी मिळत नाही आणि  शेती नको वाटणे यातून त्याला आलेले प्रचंड नैराश्य.अशा अनेक घटनांनी नव्वदोत्तर कालखंड गजबजून गेलेला दिसतो. या काळात जे साहित्य निर्माण झाले त्यावर देखील या सर्वांची छाया अगदी स्पष्टपणे जाणवते आणि म्हणूनच एखादा विविक्षित कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण होणारे साहित्य यांचा अभ्यास करणे किती महत्त्वाचे असते हे देखील अधोरेखित होते.

**निष्कर्ष:**

1) एखादा विविक्षित कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण झालेले साहित्य यांचा एक निश्चित संबंध असतो.

2) काल ही 'ना आदी ना अंत' अशी संकल्पना असली तरी काही परिमाणे निश्चित करून आपण कालाची गणना करू शकतो.

3) कालखंड ही संकल्पना मानवनिर्मित असल्याने ते कसे मानावेत याबद्दल मतभेद निर्माण होतात.

4) वाङ्मयीन स्थित्यंतरे दर्शविणाऱ्या वाङ्मयीन टप्प्यानुसार वाङ्मयीन कालखंड मानणे जास्त सयुक्तिक असते

5) वाङ्मयीन प्रकारानुसार वाङ्मयीन कालखंड वेगवेगळे असू शकतात.

6) वाङ्मयेतिहासातील कालखंडाचा अभ्यास आणि विवेक्षित कालखंडाचा वाङ्मयीन अभ्यास ही दोन भिन्न भिन्न अभ्यासक्षेत्रे आहेत.

7) कालपटाची निर्मिती कादंबरीच्या वाङ्मयीन अभ्यासाला उपयुक्त ठरते परंतु या कालपटाचा उपयोग तारतम्याने करावा लागतो

8) कालपटावर घडलेल्या घटना आणि त्याचा वाङ्मयावर पडलेला प्रभाव हा गणिती पद्धतीने मोजता येत नाही. घटनांचा एखाद्या व्यक्तिच्या मनावर कसा परिणाम होतो. तो त्या घटनांना कसा प्रतिसाद देतो यावर अवलंबून असते.

9) एखाद्या काळात घडलेल्या एखाद्या महत्त्वाच्या घटनेचा तत्कालीन वाङ्मय निर्मितीवर प्रभाव पडेलच असे नाही. काही घटनांचा प्रभाव नंतरच्या काळावरही पडतो. एकाच घटनेचे विश्लेषण वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्याप्रमाणे होणे शक्य असते. त्यामुळे कालखंड आणि त्या कालखंडातील साहित्य याचा विचार तारतम्यानेच करावा लागतो.

10) 'यमुना पर्यटन' या कादंबरीला ज्या न्यायाने मराठीतील पहिली कादंबरी म्हणून मान्यता मिळाली आहे त्याच न्यायाने 'बळीबा पाटील' या कादंबरीला पहिली मराठी ग्रामीण कादंबरी म्हणून स्थान मिळाले पाहिजे.

11) प्रारंभीच्या काळात ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखन अत्यल्प झाले याची कारणे शिक्षणाचा अभाव, ग्रामीण माणसाला साहित्य लेखनाची कोणतीच परंपरा नसणे, शहरी मध्यमवर्गीयांचे गावाप्रती असलेला तुच्छतापूर्ण दृष्टिकोन व गाव पातळीवर नंतरच्या काळात म.फुल्यांसारखे समर्थ नेतृत्व उभे न रहाणे ही आहेत.

12) 1920 पर्यंत मुख्य प्रवाहातील मराठी कादंबरी स्थिरस्थावर होऊ लागली होती तरी ग्रामीण मराठी कादंबरी

मात्र आपल्या बाल्यावस्थेतच होती.

13) 1920 च्या आसपास गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा प्रभाव मराठी कादंबरीवर पडला.

14) 1960 ते 1980 हा मराठी ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात तिच्या स्वरूप निश्चितीचा आणि विस्ताराचा कालखंड आहे.

15) स्वातंत्र्योत्तर काळात अनेक बदल कृषिक्षेत्रात झाले, नवीन तंत्रज्ञान विकसित झाले, भू-सुधार कायदे अस्तित्वात आले, हरितक्रांती झाली, नवनवीन बियाणी, किटकनाशके, खते उपलब्ध झाली, जलसिंचनाच्या नवीन योजना कार्यान्वित झाल्या सहकार चळवळ खेडोपाडी पोहचली, शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला.या सर्वाचे जे बरे-वाईट परिणाम ग्रामीण भागावर झाले त्याचे चित्रण आपणाला नंतरच्या कालखंडातील वाङ्मयावर दिसून येते.

16) १९८० नंतर ग्रामीण कादंबरीचा प्रवाह काहिसा थबकल्यासारखा वाटतो परंतु १९९० नंतर तो अधिक जोमाने पुढे आल्याचे दिसते.

17) १९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली त्याच्या सोबतच उदारीकरण आणि खाजगीकरण आले. या सर्वाचे गंभीर परिणाम ग्रामीण क्षेत्रावर झाले व त्याचे चित्रण आपणाला नव्वदोत्तर मराठी कादंबरीतून दिसून येते.

18) सुशिक्षित बेकारांची समस्या, सर्वच क्षेत्रात मोठ्याप्रमाणात पसरलेला भ्रष्टाचार, शेती बद्दल तरूणांच्या मनात निर्माण झालेली अनास्था, ग्रामीण व्यवस्थेत स्त्रियांचे होणारे शोषण, वाढलेल्या जातीय अस्मिता आणि टोकदार झालेले जाती संघर्ष असे काही नवीन विषय नव्वदोत्तर कादंबऱ्यातून नव्याने पुढे आल्याचे दिसतात.

19) एकूणच विशिष्ट कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण झालेले साहित्य यांचा अनुबंध असतो व तो आपणाला त्या काळातील लेखनातून स्पष्टपणे दिसतो.

20) १९९० नंतर मराठी ग्रामीण कादंबरीत स्थित्यंतरे अगदी स्पष्टपणे अधोरेखित होत असल्याने नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीचा वेगळा कालखंड मानणे अगदीच सयुक्तिक ठरते.

संदर्भ सूची:


1) पुंडे, दत्तात्रय, वाङ्मयीन कलखंडाचा अभ्यास' देशमुख, उषा, (संपा) ' वाङ्मयाच्या कालखंडांचा अभ्यास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,1994 पृ.7

2) पुंडे, दत्तात्रय, वाङ्मयीन कलखंडाचा अभ्यास' देशमुख, उषा, (संपा) ' वाङ्मयाच्या कालखंडांचा अभ्यास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,1994 पृ.9

3) पुंडे, दत्तात्रय,' वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास.', (संपा) कुलकर्णी, गो., म., पुंडे, दत्तात्रय, 'वाङ्मयेतिहास: सद्यःस्थिती आणि अपेक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,1995, पृ.176

4) पुंडे, दत्तात्रय,' वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास.', (संपा) कुलकर्णी, गो., म., पुंडे, दत्तात्रय, 'वाङ्मयेतिहास: सद्यःस्थिती आणि अपेक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,1995, पृ.177

5) कोत्तापल्ले, नागनाथ, प्रस्तावना, 'पाचोळा आणि दहा समीक्षक', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, 1989 पृ.10

6) यादव आनंद, 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव.' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1981, पृ.117

7) मुलाटे, वासुदेव, 'ग्रामीण कादंबरी प्रारंभ ते 1960', (संपा.) चंद्रकुमार, नलगे, ' ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृ. 13,14

8) पगार, एकनाथ, 'ग्रामीण वाङ्मय' 1950-1975, (संपा.) जाधव, रा.ग. व इतर, ' मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, 2010,पृ.396

9) मुलाटे, वासुदेव, 'ग्रामीण कादंबरी प्रारंभ ते १९६०', (संपा.) चंद्रकुमार, नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृ. 37

10) मुलाटे, वासुदेव, 'ग्रामीण कादंबरी प्रारंभ ते 1960', मंचरकर, रत्नाकर, ' ग्रामीण कादंबरी: 1960 ते 1980 आणि नंतर, (संपा.) चंद्रकुमार, नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृ. 84

11) सप्रे, अविनाश, ‘स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कादंबरी: प्रवृत्ती आणि प्रवाह’, कुलकर्णी अनिरुद्ध, (संपा.) प्रदक्षिणा खंड-2, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2008. पृ.18

12) विभुते, शंकर, ' नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी (1990 ते 2010), (संपा) टकले, संग्राम, शौर्य पब्लिकेशन, लातूर, 2017 पृ. 79